साप्ताहिक
विश्वनायक
Email: vishvanayak94@gmail.com
● संपादक : बिलाल शेख ● VISHVANAYAK Mo.8686888898

पोलीस क्रीडा स्पर्धेत बीड संघाचा डबल धमाका!

बीड । प्रतिनिधी

३७ व्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक पोलीस क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये बीड पोलीस संघाने दमदार कामगिरी करत हँडबॉल आणि फुटबॉल या दोन्ही सांघिक खेळांत दणदणीत विजय मिळवला. बीड संघाच्या या विजयामुळे स्पर्धेत खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

हँडबॉलच्या सामन्यात बीड संघाने जालना पोलीस संघावर ४१ गुणांनी मात करत शानदार विजय नोंदवला. तर फुटबॉलच्या सामन्यात छत्रपती संभाजीनगर ग्रामीण संघाचा ५-० असा एकतर्फी पराभव करत बीडच्या खेळाडूंनी आपले वर्चस्व सिद्ध केले.

दरम्यान, स्पर्धेत १००, ४००, ८०० आणि ५००० मीटर धावणे, अडथळा शर्यत, लांब उडी, भालाफेक आदी वैयक्तिक क्रीडा प्रकारही पार पडले. छत्रपती संभाजीनगर शहर, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण, बीड, जालना आणि धाराशिव या पोलीस घटकांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विविध स्पर्धांमध्ये खेळाडूंनी शिस्त, जिद्द, मेहनत आणि खिलाडूवृत्तीचे दर्शन घडवले.

बीड पोलीस विभागाच्या आयोजनाखाली १५ ते २१ नोव्हेंबरदरम्यान या स्पर्धा सुरू आहेत. पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या क्रीडागुणांना वाव देण्यासोबतच संघभावना, परस्पर समन्वय आणि पोलीस घटकांमधील बंधुभाव वाढवण्याचा या स्पर्धांचा उद्देश आहे. बीड संघाच्या सलग दोन सांघिक विजयांनी स्पर्धेतील रंगत आणखी वाढवली आहे.

■ बीड (महाराष्ट्र) ■ साप्ताहिक ■ द्विभाषिक ■ वर्ष - ०१ ■ अंक - ४७ ■ मंगळवार दि.१७ नोव्हेंबर २०२६ ■ पीआरजीआय रजि.नं.- एमएचबीआयएल/२५/ए४९८० ■ किंमत २ रू. ■ पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Weekly ■ BILINGUAL ■ Year - 01 ■ Issue - 47 ■ Tuesday Dt. 17 November 2026 ■ PRGI.REG.No. MHBIL/25/A4980 ■ Price - 2 Rupees ■ Pages 4

जिल्हा रुग्णालयाचे कॅन्टीन मॅनेजर अब्दुल गणीभाई ठरताहेत खऱ्या अर्थाने 'देवदूत'

मध्यरात्रीच्या अंधारात माणुसकीचा दिवा; कोणीही उपाशी झोपू नये हाच ध्यास!

रात्रीच्या अंधारात बेघरांची भूक भागवणारा 'अन्नदानाचा' महायज्ञ; गणीभाईंना राज्यस्तरीय पुरस्कार देण्याची बीडकरांची आक्रमक मागणी!

स्वार्थाची पोळी भाजणाऱ्या 'समाजकंटकांचे' थोबाड फुटले; 'देवदूत' अब्दुल गणीभाईंना बदनाम करण्याचे कुटील कारस्थान फसले!



बीड । विश्वनायक न्यूज

जिल्हा रुग्णालयातील जेवण म्हणजे पाणचट वरण आणि बेचव भाजी, अशीच काहीशी प्रतिमा आजवर समाजात बनलेली आहे. मात्र, बीड जिल्हा रुग्णालयातील कॅन्टीन मॅनेजर अब्दुल गणीभाई यांनी आपल्या अफाट सेवाभावी वृत्तीने आणि चोख व्यवस्थापनाने या नकारात्मक प्रतिमेला जोरदार तडा दिला आहे. रुग्णांच्या सेवेलाच ईश्वरसेवा मानणाऱ्या गणीभाईंच्या पुढाकाराने येथील रुग्णांना चक्क 'फाईव्ह स्टार' हॉटेलला लाजवेल असे शुद्ध, सकस आणि चवदार भोजन मिळत आहे. केवळ रुग्णालयापुरते मर्यादित न राहता, रात्रीच्या वेळी शहरातील बेघर आणि निराधारांचा शोध घेऊन त्यांची भूक भागवणारे अब्दुल गणीभाई गोरगरिबांसाठी खऱ्या अर्थाने 'देवदूत' ठरले आहेत.

जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या गरीब व गरजू रुग्णांना औषधांसोबतच पौष्टिक आहाराची नितांत गरज असते. हीच नस ओळखून अब्दुल गणीभाई स्वतः जातीने लक्ष घालून स्वयंपाकघराचे नियोजन करतात. कॅन्टीनच्या स्वयंपाकघराची दररोज अत्यंत दर्जेदार स्वच्छता केली जाते, तसेच जेवण बनवण्यासाठी केवळ ताज्या आणि निवडक भाज्यांचाच वापर केला जातो. प्रत्येक वॉर्डातील रुग्णांच्या गरजेनुसार वेळोवेळी व्हिटॅमिनयुक्त जेवण, वाफाळता चहा, केळी, उकळलेली अंडी, दूध, ब्रेड, पोहे आणि उपमा असे विविध पौष्टिक पदार्थ अत्यंत आपुलकीने पोहोचवले जातात. जेवणाच्या या उच्च दर्जापुढे खासगी रुग्णालयांची व्यवस्थाही फिकी पडत असून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून समाधानाची पावती मिळत आहे.अब्दुल गणीभाईंचे कार्य केवळ पगारापुरते किंवा रुग्णालयाच्या चार भिंतींपुरते मर्यादित नाही. दररोज कॅन्टीनमधून कित्येक गरजूंना कसलीही अपेक्षा न ठेवता मोफत जेवणाचे डबे दिले जातात. इतकेच नव्हे, तर रात्री कॅन्टीन बंद झाल्यानंतर सर्वजण विश्रांती घेत असताना गणीभाई स्वतः आपली गाडी घेऊन बीड शहराच्या रस्त्यांवर उतरतात. रेल्वे स्थानक, बस स्थानक आणि फुटपाथवर कुडकुडत झोपलेल्या निराधार, बेघर आणि भिकाऱ्यांना शोधून ते स्वतःच्या हातने जेवणाचे डबे देतात. बीड शहरात कोणीही उपाशीपोटी झोपू नये, हा त्यांचा निश्चय आज अनेकांचे प्राण वाचवत आहे.



शासनाने आता तरी डोळे उघडावेत; राज्यस्तरीय पुरस्काराची जोरदार मागणी!

कोणताही गाजावाजा, प्रसिद्धीचा हव्यास किंवा दिखावा न करता अब्दुल गणीभाईंचा हा माणुसकीचा यज्ञ अहोरात्र सुरू आहे. एकीकडे भ्रष्टाचाराच्या आणि कामचुकारपणाच्या बातम्या रोज कानावर पडत असताना, गणीभाईंसारखे निस्वार्थी कर्मयोगी समाजापुढे एक आदर्श निर्माण करत आहेत. शासन आणि जिल्हा प्रशासनाने या अवलियाच्या कार्याची तातडीने दखल घ्यावी आणि त्यांना 'राज्यस्तरीय पुरस्कार' देऊन सन्मानित करावे, अशी आक्रमक आणि आग्रही मागणी आता सर्वसामान्य नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांमधून जोर धरू लागली आहे.

बीडकरांचा संताप; समाजकंटकांना खडेबोल

ज्या व्यक्तीने सरकारी रुग्णालयातील जेवणाचा दर्जा 'फाईव्ह स्टार' केला आणि जो माणूस कोणीही उपाशी झोपू नये म्हणून रात्रंदिवस झटतो, अशा 'देवदूता'वर चिखलफेक करणाऱ्या समाजकंटकांवर बीडकर नागरिक प्रचंड संतापले आहेत. रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांनीच गणीभाईंच्या स्वच्छता, ताज्या भाज्या आणि पौष्टिक जेवणाची साक्ष देत विरोधकांचे दावे फोल ठरवले आहेत. स्वतः तर गरिबांना एक घास द्यायचा नाही, आणि जो देतोय त्याच्या कामात अडथळे आणायचे, अशा शब्दांत नागरिकांनी या समाजकंटकांचा समाचार घेतला आहे.

अवैध दारू विक्रेत्यांसह मद्यपींवर शिवाजीनगर पोलिसांचा दणका!

बीड । प्रतिनिधी

बीड शहर व परिसरातील अवैध दारू विक्री आणि सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करणाऱ्यांविरोधात शिवाजीनगर पोलिसांनी एकाच दिवशी दोन स्वतंत्र कारवाया केल्या. चरता फाटा येथील अश्विनी हॉटेलवर छापा टाकून ९ लाख ३ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला, तर बेलेश्वर मंदिराजवळील सर्कस मैदानावर मद्यपान करणाऱ्या पाच जणांना पकडून त्यांच्याकडून २ लाख २० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. दोन्ही कारवायांत एकूण ११ लाख २४ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

१४ नोव्हेंबर रोजी रात्री ८.१५ वाजण्याच्या सुमारास चरटा फाटा येथील अश्विनी हॉटेलवर पोलिसांनी छापा टाकला. यावेळी हॉटेलमध्ये अवैधरीत्या देशी व विदेशी दारूची विक्री तसेच मद्यपानासाठी दारू उपलब्ध करून दिली जात असल्याचे आढळले. या कारवाईत हॉटेल मालक बाजीराव भगवानराव दहीफळे (रा. संभाजीनगर, बीड) याच्याशी संबंधित देशी-विदेशी दारूच्या सीलबंद बाटल्या, मोबाईल, मोटारसायकल



आणि टाटा नेक्सॉन कार असा ९ लाख ३ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (ई) व ६८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसरी कारवाई त्याच रात्री ८.५० वाजता बेलेश्वर मंदिराजवळील सर्कस मैदानावर करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी मद्यधुंद अवस्थेत असलेल्या वैभव वैजनाथ जोशी, सौरभ प्रभाकर मोरे, सक्षम अतिश भालेराव, रोहित रानूजी गोरे आणि निखिल अमोल डोंगरे या पाच जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडून दारूच्या बाटल्या, दोन मोटारसायकली आणि दोन महागडे मोबाईल असा २ लाख २० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या पाच जणांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (ई) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

या दोन्ही कारवाया पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, प्रभारी पोलीस अधीक्षक चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांच्या नेतृत्वाखाली शिवाजीनगर पोलीस पथकाने केल्या. या पथकात पोलीस उपनिरीक्षक राख, पोलीस हवालदार निंबाळकर, पोलीस कर्मचारी नितीन भोंडवे, शुभम सोनवणे, सुनील आडे व इतर कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.

पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी अवैध धंद्यांविरोधात कारवाईचे निर्देश दिले असून, त्यानुसार शिवाजीनगर पोलिसांनी केलेल्या या दोन कारवायांमुळे अवैध दारू विक्रेते आणि सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करणाऱ्यांना स्पष्ट इशारा मिळाला आहे.

घरातून निघून गेलेल्या तरुणाचा बीड शहर पोलिसांनी लावला शोध

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील माळी गल्ली येथील २२ वर्षीय कुमार रामराव मनेरी हा तरुण १३ नोव्हेंबर रोजी घरातील कोणालाही काहीही न सांगता अचानक निघून गेला. तरुण बराच वेळ घरी परतला नसल्याने कुटुंबीय, नातेवाईक आणि मित्रपरिवार चिंतेत पडला होता.

घटनेची माहिती मिळताच बीड शहर पोलिसांनी तत्परतेने शोधकार्य सुरू केले. पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली झडख जाधव व त्यांच्या पथकाने तांत्रिक तपासाची मदत घेत कौशल्यपूर्ण शोधमोहीम राबवली.

अखेर १४ नोव्हेंबर रोजी पोलिसांनी कुमार मनेरी याचा शोध घेऊन त्याला सुखरूप ताब्यात घेतले आणि त्याची आई श्रीमती अंजना मनेरी यांच्या स्वाधीन केले. तरुण सुखरूप परतल्याने चिंतेत असलेल्या आईसह संपूर्ण कुटुंबीयांचा जीव भांड्यात पडला. बीड शहर पोलिसांच्या तत्परतेमुळे एका आईच्या चेहऱ्यावर पुन्हा आनंद फुलला. या कामगिरीबद्दल पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर व त्यांच्या पथकाचे कौतुक होत आहे.

अपहरण करुन ट्रॅव्हल्सच्या डिक्कीत डांबल्याचा बनाव; डायल ११२ वर खोटा फोन

माजलगाव व गेवराई पोलिसांची धावपळ; तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल

माजलगाव । अखिल शेख

अपहरण करून ट्रॅव्हल्सच्या डिक्कीत डांबून ठेवल्याची खोटी माहिती आपत्कालीन डायल ११२ सेवेवर देऊन पोलिसांची दिशाभूल करणाऱ्या तरुणाविरुद्ध माजलगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भागवत संभाजी चौरे (वय २५, रा. सायाळा, ता. पालम, जि. परभणी) असे गुन्हा दाखल झालेल्या तरुणाचे नाव आहे.

११ नोव्हेंबर रोजी रात्री ११.४८ वाजण्याच्या सुमारास डायल ११२ या आपत्कालीन सेवेवर फोन आला. एका बसमध्ये आपल्याला जबरदस्तीने डांबून ठेवले असून, ट्रॅव्हल्सच्या डिक्कीत बंद करून अपहरण करण्यात येत असल्याचे फोन करणाऱ्या तरुणाने सांगितले. तसेच, आपल्या जिवाला धोका असल्याचे सांगत तातडीने मदतीची मागणी केली. या गंभीर माहितीमुळे माजलगाव ग्रामीण पोलिस ठाण्याचे पथक आणि गेवराई पोलिस तत्काळ सतर्क झाले. संबंधित तरुणाने दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिस यंत्रणेची धावपळ उडाली. मात्र, अपहरणाबाबत खोटी माहिती देऊन पोलिसांची दिशाभूल केल्याप्रकरणी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम २१२ नुसार, सार्वजनिक सेवकाला जाणूनबुजून खोटी माहिती देणे हा दंडनीय गुन्हा आहे. या कलमांतर्गत परिस्थितीनुसार सहा महिने किंवा एक वर्षापर्यंत कारावास, दंड किंवा दोन्ही शिक्षांची तरतूद आहे.

सुशील वाल्मिक कराडचा शस्त्र परवाना केला रद्द!

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात शस्त्र परवान्याचा वापर प्रतिष्ठा मिरवण्यासाठी आणि जनतेत दहशत निर्माण करण्यासाठी केला जात असल्याच्या चर्चांना आता जिल्हा प्रशासनाने चाप लावण्यास सुरुवात केली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड याचा मुलगा सुशील वाल्मिक कराड याचा शस्त्र परवाना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी रद्द केला आहे. सोलापूर येथे गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल झाल्यानंतर प्रशासनाने घेतलेला हा निर्णय विशेष महत्त्वाचा मानला जात आहे.

सुशील कराड याच्यासह अनिल मुंडे आणि गोपी गंजेवार यांच्याविरोधात ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी सोलापूर येथे १४ कलमान्वये गुन्हा दाखल झाला आहे. यामध्ये पोक्सो कायद्यातील कलमांचाही समावेश आहे. एका महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार घरात घुसून रिव्हॉल्व्हरचा धाक दाखवणे, मारहाण, अल्पवयीन मुलीचा विनयभंग, जीवे मारण्याची धमकी आणि मालमत्ता बळकावण्याचा प्रयत्न असे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. या तक्रारीची आणि संबंधित पार्श्वभूमीची दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांनी शस्त्र परवाना रद्द करण्याचा निर्णय घेतला.

बीड जिल्ह्यात काही राजकीय पदाधिकारी आणि इतर व्यक्तींकडून शस्त्र परवाना मिळवून पिस्तूल मिरवण्याचे प्रकार यापूर्वीही चर्चेत आले आहेत. कमरेला पिस्तूल लावून फोटो काढणे, सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल करणे आणि शस्त्राच्या माध्यमातून आपली हवा निर्माण करण्याचा प्रयत्न करणे, असे प्रकार समोर आले आहेत. यापूर्वीही अशा प्रकरणांत शस्त्र परवाने रद्द झाल्याच्या घटना घडल्या आहेत.

एक्सपायर औषधे विकणाऱ्या मेडिकलला ठोकले सील; औषधं, गोळ्या विक्रीला ब्रेक!

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील गुरुमाऊली हॉस्पिटल परिसरातील 'खुशी हेल्थकेअर' मेडिकलमधून गंभीर रुग्णाला मुदत संपलेली औषधे दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्यानंतर अखेर अन्न व औषध प्रशासनाला जाग आली आहे. रुग्णांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या प्रकाराची दखल घेत प्रशासनाने शुक्रवारी संबंधित मेडिकलची तपासणी करून औषध विक्री व्यवसाय तात्पुरत्या स्वरूपात बंद ठेवण्याचे प्रतिबंधात्मक आदेश दिले आहेत. सहाय्यक आयुक्त महादेव निमसे यांनी स्वतः तपासणी केली असून मेडिकलला कारणे दाखवा नोटीसही बजावण्यात आली आहे.

गुरुमाऊली हॉस्पिटलमध्ये उपचार घेणाऱ्या मधुमेहग्रस्त वृद्ध महिलेला संबंधित मेडिकलमधून औषधे देण्यात आली होती. मात्र, औषधांच्या पाकिटावरील अंतिम मुदत तपासली असता ती औषधे ऑक्टोबर २०२५ मध्येच कालबाह्य झाल्याचे समोर आले. म्हणजेच मुदत संपून जवळपास वर्षभर झालेली औषधे रुग्णाच्या हातात देण्यात आली. औषध विक्रीतील हा निष्काळजीपणा केवळ व्यापारी अनियमितता नसून रुग्णांच्या आरोग्याशी संबंधित गंभीर बाब आहे.

तक्रारीनंतर अन्न व औषध प्रशासनाने खुशी हेल्थकेअरची तपासणी केली. यावेळी औषध व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० आणि त्याअंतर्गत नियमांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे मेडिकलचा औषध विक्री व्यवसाय तात्पुरता थांबविण्याचे आदेश देण्यात आले असून संबंधितांकडून खुलासा मागविण्यात आला आहे. खुलाशाची तपासणी करून पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

फार्मासिस्टचा परवाना कोणाच्या नावावर, औषधे विकतोय कोण?

या घटनेमुळे मेडिकलच्या परवान्यापासून प्रत्यक्ष औषध विक्रीपर्यंतच्या संपूर्ण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



नोंदणीकृत फार्मासिस्ट प्रत्यक्ष दुकानात उपस्थित असतो का? त्याच्या अनुपस्थितीत दुसऱ्याच व्यक्तीकडून औषधांची विक्री केली जाते का? परवाना एका व्यक्तीच्या नावावर आणि दुकानाचा कारभार दुसऱ्याच व्यक्तीकडे आहे का? या बाबींचीही प्रशासनाने तपासणी करणे गरजेचे आहे.

एका मेडिकलवर कारवाई पुरेशी नाही; जिल्हाभर झाडाझडती घ्या!

गुरुमाऊली हॉस्पिटलमधील या मेडिकलमध्ये मुदतबाह्य औषधे यापूर्वीही विकली गेली होती का? औषधांचा साठा नियमित तपासला जात होता का? मुदत संपलेल्या औषधांची विल्हेवाट लावण्याचे नियम पाळले जात होते का? या प्रश्नांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे. केवळ एका मेडिकलवर कारवाई करून प्रशासनाने समाधान मानू नये. बीड शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील मेडिकल दुकानांची विशेष तपासणी मोहीम राबवावी. औषधांची मुदत, साठवणूक, विक्री अभिलेख, परवाना आणि नोंदणीकृत फार्मासिस्टची प्रत्यक्ष उपस्थिती तपासावी. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी.

औषधे विकणे हा सामान्य व्यापार नाही, तर रुग्णांच्या जीवाशी निगडित जबाबदारी आहे. मग मुदत संपून वर्षभर झालेल्या गोळ्या रुग्णाच्या हातात कशा पोहोचतात? मेडिकल चालकांचा निष्काळजीपणा तपासणार कोण? प्रशासनाच्या नियमित तपासण्या नेमक्या होतात तरी कुठे? एका वृद्ध महिलेला मुदतबाह्य औषधे दिल्यानंतरच यंत्रणेला जाग येणार असेल, तर ही बाब अधिक गंभीर आहे. आता खुशी हेल्थकेअरवरील कारवाईपुरतीच मोहीम थांबणार की जिल्ह्यातील सर्व मेडिकलची झाडाझडती होणार, हा खरा प्रश्न आहे. दरम्यान, नागरिकांनी मेडिकलमधून औषधे घेताना उत्पादन तारीख आणि अंतिम मुदत आवर्जून तपासावी, व मेडिकल मध्ये एक्सपायरी औषधं, गोळ्या विक्री होत असेल तर आमच्या कार्यालयाशी संपर्क करावा असे आवाहन अन्न व औषध प्रशासन सहआयुक्त महादेव निमसे यांनी केले आहे.



राजकीय संघर्षाचा काळ

एकीकडे इंडिया आघाडीचे नेते आणि देशातील जेन-झीचा झंझावात, तर दुसरीकडे सरकारची मुत्सद्देगिरी असा संघर्ष देशात बघायला मिळण्याची शक्यता आहे. या महिन्याच्या दुसर्या किंवा तिसर्या आठवड्यापासून संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला सुरुवात होईल. याशिवाय, उत्तरप्रदेशसह पाच राज्यांमध्ये विधानसभेची निवडणूक होणे आहे. या निवडणुकांच्या तयारीसाठी दिल्लीत इंडिया आणि रालोआतील घटक पक्षांच्या मॅराथॉन बैठकांची मालिका सुरु होईल. यामुळे, दिवाळी संपल्यानंतरचा हा आठवडा प्रचंड राजकीय घडामोडींचा आठवडा ठरू शकतो. नोव्हेंबरच्या सुरुवातीलाच इंडिया आघाडीतील सर्व घटक पक्षांनी सरकारविरूद्धची लढाई रस्त्यावर लढण्याचा शंखनाद रामलीला मैदानावर केला होता. कॉंग्रेोच जनता पार्टी दिवाळीनंतर आपला लढा पुन्हा तीव्र करणार आहे. अशात, आगामी काळ हा राजकीय संघर्षाचा काळ म्हणून बघायला मिळू शकतो. महत्त्वाचे म्हणजे, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांना पदावरून हटविण्यासाठी सर्व विरोधी पक्ष एकजूट झाल्यामुळे सरकारपुढे नवीन संकट निर्माण झाले आहे. एसआयआर रद्द करण्यासोबतच ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्यासाठी विरोधकांनी कंबर कसली आहे. विरोधकांनी रामलीला मैदानावर केलेल्या रॅलीचा सरकारवर असा काही परिणाम झाला की अवघ्या दोन तासांत तीन-तीन मंत्री आणि भाजपच्या प्रवक्त्यांना मॅराथॉन पत्रकार परिषदा घेऊन विरोधकांचे म्हणणे खोडावे लागले, तर गृहमंत्री अमित शहा यांनी हैदराबादमध्ये मिरवणूक काढली. देशवासीयांनी आतापर्यंत विरोधी पक्षांचा सरकारविरूद्धचा लढा बघितला होता. मात्र, सरकारने विरोधी पक्षांविरूद्ध रस्त्यावर उतरण्याची ही कदाचित पहिलीच वेळ असावी. देशवासीयांसाठी हे नवीन आहे. हा प्रकार या आठवड्यापासून पुन्हा बघायला मिळू शकतो. दिल्लीच्या राजकारणात सध्या भाषणांपेक्षा संवाद आणि आरोप-प्रत्यारोप अधिक चर्चेत आहेत. रामलीला मैदानावरील 'व्होट बचाओ, देश बचाओ' रॅलीनंतर संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. एका बाजूला कॉंग्रेस लोकशाही संस्था आणि निवडणूक प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित करत आहे, तर दुसर्या बाजूला भाजप विरोधकांवर अराजक निर्माण करण्याचा आरोप करत आहे. या संघर्षातून २०२९ च्या लोकसभा निवडणुकीची राजकीय दिशा स्पष्ट होताना दिसत आहे. रामलीला मैदानावरील रॅलीत राहुल गांधी यांनी मतदार यादीच्या विशेष पुनरावलोकन प्रक्रियेवर कठोर टीका करत, मतदारांचा आवाज दडपला जात असल्याचा आरोप केला. त्यांच्या भाषणाचा केंद्रबिंदू निवडणूक आयोगाची भूमिका आणि लोकशाही संस्थांवरील विश्वास हा होता. कॉंग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनीही ही लढाई केवळ एका निवडणुकीची नसून संविधान आणि लोकशाही वाचविण्याची असल्याचे सांगितले. विरोधकांनी एकत्र येऊन हा मुद्दा राष्ट्रीय चर्चेच्या केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न केला. मल्लिकार्जुन खर्गे यांची भूमिका या संपूर्ण संघर्षात महत्त्वाची ठरत आहे. कॉंग्रेस संघटनात्मकदृष्ट्या मजबूत करण्याबरोबरच विविध विरोधी पक्षांना एकत्र ठेवण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. रामलीला मैदानावरील रॅलीत त्यांनी संयमित पण ठाम भूमिका घेत, सर्व विरोधी पक्षांना एकाच मंचावर उभे केले. राहुल गांधी आक्रमक राजकीय चेहरा असतील, तर खर्गे समन्वयक आणि संघटक म्हणून पुढे येत असल्याचे चित्र आहे. या संपूर्ण घडामोडीत संवादाची शैलीही बदलताना दिसते. पूर्वी संसदेपुरते मर्यादित असलेले राजकीय वाद आता रॅली, सोशल मीडिया आणि पत्रकार परिषदांमधून अधिक तीव्र होत आहेत. रामलीला मैदानावरील कार्यक्रमाने आणखी एक संदेश दिला. विरोधक आता केवळ संसदेत सरकारला घेरण्यावर अवलंबून राहणार नाहीत. ते रस्त्यावरही जनमत तयार करण्याचा प्रयत्न करतील. दुसरीकडे भाजपही प्रत्येक आंदोलनाला राजकीय आव्हान म्हणून स्वीकारत प्रतिआंदोलनाची रणनीती आखत आहे. त्यामुळे दिल्ली पुन्हा एकदा राष्ट्रीय राजकीय संघर्षाचे प्रमुख केंद्र बनत आहे. गेल्या दोन वर्षांत 'इंडिया' आघाडीतील अनेक पक्षांमध्ये जागावाटप, प्रादेशिक स्पर्धा आणि नेतृत्वाच्या प्रश्नांवर मतभेद उघड झाले होते. पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, पंजाब आणि दिल्लीमध्ये अनेकदा वेगवेगळ्या भूमिका दिसून आल्या. मात्र रामलीला मैदानावरील रॅलीत जवळपास सर्व प्रमुख विरोधी पक्ष एकाच व्यासपीठावर दिसले. भाषणांमध्ये बहुतांश नेत्यांनी एकाच मुद्द्यावर भर दिला. मतदार यादीतील कथित अनियमितता आणि निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेबाबत प्रश्न. यामुळे विरोधकांनी आपली राजकीय ऊर्जा एका समान अजेंड्यावर केंद्रित करण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट झाले. लोकसभा निवडणुकीनंतर राहुल गांधी विरोधी राजकारणाचा प्रमुख चेहरा म्हणून अधिक आक्रमक झाले आहेत. या रॅलीतही त्यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले. त्यांच्या भाषणातून निवडणूक आयोग, मतदार यादी आणि लोकशाही संस्थांबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले. विरोधी पक्षांना एकत्र ठेवण्याची जबाबदारीही त्यांनी स्वीकारल्याचे या कार्यक्रमातून दिसले. ही रॅली राहुल गांधींसाठी केवळ आंदोलन नव्हते, तर राष्ट्रीय स्तरावरील नेतृत्व सिद्ध करण्याची संधी होती. गेल्या काही महिन्यांत विरोधकांनी संसदेबरोबरच रस्त्यावरही संघर्षाची भूमिका घेतली आहे. रामलीला मैदानाची निवडही प्रतीकात्मक होती. जंतर-मंतरऐवजी रामलीला मैदानाला आंदोलनासाठी परवानगी मिळाल्यानंतर ही पहिली मोठी सभा ठरली. मोठी गर्दी, विविध राज्यांतील कार्यकर्त्यांचा सहभाग आणि एकत्रित संदेश यामुळे विरोधकांनी 'जनतेचा मुद्दा' उभा करण्याचा प्रयत्न केला. या रॅलीचा संदेश केवळ केंद्र सरकारला नव्हता तो विरोधी पक्षांच्या कार्यकर्त्यांसाठीही होता. अनेक राज्यांत निवडणुका जवळ येत असताना कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढविणे, मतदारांमध्ये सरकारविरोधी वातावरण तयार करणे आणि 'लोकशाही धोक्यात आहे' हा मुद्दा सातत्याने पुढे ठेवणे ही या कार्यक्रमामागील राजकीय रणनीती असल्याचे दिसते. राजकीय निरीक्षकांच्या मते, ही रॅली २०२९ च्या लोकसभा निवडणुकीच्या दीर्घ मोहिमेची सुरुवात मानली जाऊ शकते. भाजपविरोधात समान कथानक उभे करणे, संयुक्त प्रचाराची दिशा ठरविणे आणि विविध प्रादेशिक पक्षांना एका मंचावर टिकवून ठेवणे ही इंडिया आघाडीसमोरील मोठी आव्हाने आहेत. रामलीला मैदानावरील कार्यक्रमाने या दिशेने एक संदेश दिला असला, तरी तो निवडणुकीतील यशात किती रूपांतरित होतो, हे आगामी राज्य निवडणुकांवर अवलंबून असेल. आठवड्याच्या सुरुवातीलाच कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी उत्तराखंड कॉंग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांसोबत बैठक घेतली. बैठकीत २०२७ च्या विधानसभा निवडणुकीची तयारी, संघटनात्मक मजबुती, स्थानिक प्रश्न आणि पक्षाच्या आंदोलनात्मक कार्यक्रमांचा आढावा घेण्यात आला. कॉंग्रेसच्या बैठकीनंतर भाजपनेही उत्तराखंडमध्ये संघटनात्मक हालचाली वाढवल्या. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी देहराडूनमध्ये भाजपच्या कोअर कमिटीची बैठक घेतली. या बैठकीत बूथ व्यवस्थापन, संघटन विस्तार, स्थानिक नेतृत्व आणि आगामी विधानसभा निवडणुकीची रणनीती यावर सविस्तर चर्चा झाली. उत्तराखंडमधील निवडणुकीला भाजपने प्रतिष्ठेची लढत मानल्याचे या बैठकीतून स्पष्ट झाले.

दुष्काळाच्या दाहकतेत मानेवाडीकरांना मोठा दिलासा लोकनेते स्व. अजित दादा पवार व स्व.विनायकराव मेटे आणि संघर्षयोद्धा मनोज जरांगे-पाटील यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन सरसकट १७२ कुटुंबांना 'गोड सिधा' वाटप

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या माध्यमातून चौसाळा जिल्हा परिषद सर्कल मध्ये दीपावली निमित्त गरजवंत कुटुंबियांना गोड सिधा वाटप करणार : पांडुरंग आवारे-पाटील

चौसाळा-बीड । प्रतिनिधी

यंदा बीड जिल्ह्यात ओढवलेली तीव्र दुष्काळी परिस्थिती, निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतीमालाचे झालेले अतोनात नुकसान आणि ग्रामीण भागात निर्माण झालेली आर्थिक चणचण, यामुळे बळीराजासह कष्टकरी वर्ग प्रचंड संकटात सापडला आहे. सणासुदीच्या दिवसांतही दुष्काळाचे काळे सावट उंबरठ्यावर असताना, मानेवाडी ता.जि. बीड येथील एकाही घरात दिवाळीचा अंधार राहू नये आणि प्रत्येक कुटुंबाला सणाचा गोडवा चाखता यावा, या उदात्त भावनेतून गावातील सरसकट १७२ कुटुंबांना दीपावलीनिमित्त फराळ व जीवनावश्यक धान्याच्या 'गोड सिधा किट'चे वाटप करण्यात आले.

राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित दादा पवार पक्षाचे युवा नेते, मराठा सेवक तथा मानेवाडीचे सुपुत्र पांडुरंग आवारे-पाटील यांच्या पुढाकाराने आणि त्यांच्या सामाजिक कार्यावर विश्वास ठेवणाऱ्या एका अज्ञात दानशूर व्यक्तीच्या अनमोल सहकार्यातून दि. १० नोव्हेंबर रोजी हा उपक्रम पार पडला.

विचार आणि प्रामाणिक कामाची पोचपावती! : पांडुरंग आवारे-पाटील

याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना युवा नेते पांडुरंग आवारे-पाटील म्हणाले लोकनेते स्व.अजितदादा पवार यांनी दिलेली सर्वसमावेशक विकासाची शिकवण आणि लोकनेते स्व.विनायकराव मेटे साहेब यांच्या सामाजिक कामाचा वसा आणि वारसा त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून पुढे घेऊन जात आहे, म्हणून व संघर्षयोद्धा मनोज जरांगे-पाटील यांनी समाजाच्या हक्कांसाठी व न्यायासाठी दिलेली संघर्षाची ऊर्जा, हेच विचार आम्ही निष्ठेने आणि प्रामाणिकपणे तळागाळापर्यंत पुढे नेत आहोत. आमच्या या सामाजिक बांधिलकीची आणि संघर्षाची दखल घेऊनच एका दानशूर अज्ञात व्यक्तीने मानेवाडीतील सर्वसामान्य ग्रामस्थांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्णय घेतला. राजकारण आणि मतभेद बाजूला ठेवून दुष्काळाच्या संकटात आपल्या मातीतील लोकांचे अश्रू पुसणे हेच आमचे आद्यकर्तव्य आहे.



दुष्काळाच्या सावटात मानेवाडीत फुलला आनंद

सध्या दुष्काळामुळे ग्रामीण भागातील अर्थचक्र पूर्णतः कोलमडले असून सर्वसामान्यांपुढे संसाराचा गाडा हाकणे कठीण झाले आहे. अशा अत्यंत बिकट काळात मानेवाडीमध्ये कोणत्याही घटकाचा वा जाती-धर्माचा भेदभाव न करता, गावांतील प्रत्येक कुटुंबाला प्रत्यक्ष भेटी देऊन तेल, साखर, रवा, मैदा, डाळ व इतर गोड फराळाचे साहित्य समाविष्ट असलेल्या सिधा व जिवन आवश्यक १० वस्तू किटचे वाटप करण्यात आले. दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या मानेवाडीकरांसाठी ही मदत सणासुदीच्या काळात मोठा आधार ठरली असून, संकटसमयी धावून आल्याबद्दल सर्व ग्रामस्थांनी पांडुरंग आवारे-पाटील आणि त्या अज्ञात दात्याचे अंतःकरणपूर्वक आभार मानले.

लोकनेते स्व.अजित दादा पवार व लोकनेते स्व.विनायकराव मेटे साहेब यांच्या स्मरणार्थ राष्ट्रवादीकॉंग्रेस पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या महिला लोकप्रिय उपमुख्यमंत्री तथा बीड आणि पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री आदरणीय सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांच्या माध्यमातून बीड तालुक्यातील चौसाळा जि.प.गटातील २७ गावांतील प्रत्येक गरजवंत कुटुंबियांना दीपावली निमित्त गोड सिधा वाटप करण्याचा मानस आणि निर्धार राष्ट्रवादीकॉंग्रेस पार्टीचे बालाघाटाचे नेते तथा मानेवाडीचे ग्रा.प.सदस्य, कॉटन इंडिया हाऊस इंडस्ट्रीजचे डायरेक्टर, मराठा सेवक पांडुरंग आवारे-पाटील यांनी केला आहे.

याप्रसंगी मानेवाडी गावातील ज्येष्ठ मंडळी, महिला-भगिनी, तरुण सहकारी, आजी-माजी पदाधिकारी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांचे आभार समाजसेवक दिगांबर तात्या आवारे यांनी मानले आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा आणि संघर्ष योद्धे मा. मनोज जरांगे-पाटील यांचा जय घोष करत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. अवर्जुन उपस्थिती कॉटन इंडिया हाऊसन(आळंदी) चे मालक, उद्योजक हनुमंत आवारे-पाटील, मंत्री लिलन हाऊस (मोशी) चे मालक उद्योजक लक्ष्मण शिंदे पाटील, नामदेव माने, बाळासाहेब माने, रमेश माने, निलेश माने, महादेव माने, स्वामी माने, बापुराव मोरे, सचिन मोरे, बालाजी माने, तुषार आवारे, शिवराज माने, लक्ष्मण इंगोले, सुदर्शन आवारे, सुधीर आवारे, सौरभ आवारे, मेननाथ आवारे, राहुल जाधव, गणेश आनंदराव कचरे, प्रकाश माने, दत्ता माने, अनिल आहीरे, लोकेश माने, संदीप गाडे, स्वामी इंगोले, शहाजी इंगोले, अभिमान व्यवहारे, माधव मोरे, अनिल माने, अशोक टाके, डॉ.सुबोध नामदेव माने, बबन माने, मानिक माने, बारीकराव अमृत इंगोले, रमेश जयद्रथ मोरे, शिदेश्वर ईश्वर माने, ओम रंजित माने, किशोर किसन जगताप, सुभाष मोरे, विशाल दादाराव मोरे, शिवाजी गाढवे, दिपक विलास गाढवे, महेश राम माने व अन्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांचे आभार समाजसेवक दिगांबर आवारे यांनी मानले.

शेतकऱ्यांना खंडणीखोर ठरवण्याचे पाप जिल्हा पोलिस प्रशासनाच्या माथी! भविष्यात शेतकरी आत्महत्यांमध्ये वाढ झाल्यास जिल्हा प्रशासन जबाबदार : डॉ. ढवळे

पवनचक्की कंपन्यांची दडपशाही सुरूच; मावेजा मागणाऱ्या शेतकऱ्यांना खंडणीच्या गुन्ह्यांची धमकी, माळेवाडीत उभ्या ज्वारीच्या पिकातून विनापरवाना वाहनांची वाहतूक!

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात पवनचक्की कंपन्यांकडून पोलिस व महसूल प्रशासनाच्या कथित पाठबळावर शेतकऱ्यांची पिळवणूक सुरू असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी केला आहे. स्वतःच्या जमिनीचा न्याय्य मोबदला (मावेजा) मागणाऱ्या शेतकऱ्यांनाच खंडणीखोर ठरवून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांच्या तक्रारींची दखल घेऊन त्यांना न्याय देण्याऐवजी कंपन्यांच्या बाजूने प्रशासन उभे राहत असल्याचा आरोप आहे. त्यामुळे पवनचक्की कंपन्यांचे मनोबल वाढत असून शेतकरी मात्र न्यायासाठी दारोदारी भटकत आहेत. प्रशासकीय स्तरावर न्याय मिळत नसल्याने नैराश्यातून विषारी औषध प्राशन करणे अथवा अंगावर पेट्रोल ओतून आत्महत्येचा प्रयत्न करण्यासारख्या टोकाच्या घटना घडण्याची परिस्थिती निर्माण होत असल्याबद्दल डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी गंभीर चिंता व्यक्त केली.

बीड तालुक्यातील बालाघाटावरील चौसाळा परिसरात टोरांटो कंपनीच्या पवनऊर्जा प्रकल्पाचे काम सुरू आहे. कंपनीचे अधिकारी व कर्मचारी मावेजाची मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांना दमदाटी करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची धमकी देत असल्याचे प्रकार गेल्या आठवड्यात कानडीघाट येथील शेतकऱ्यांसोबत घडल्याचा आरोप आहे.

याच परिसरातील सचिन वामनराव भरणे यांच्या माळेवाडी शिवारातील गट क्रमांक ३२५ मधील उभ्या ज्वारीच्या पिकातून कोणतीही पूर्वपरवानगी न घेता पवनचक्की कंपनीच्या वाहनांची वाहतूक करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे नुकसान होत असताना संबंधित कंपनीविरोधात दाद मागायची कोणाकडे आणि न्याय मिळवायचा कोणाकडून, असा संतप्त सवाल शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

प्रशासनाने वेळीच हस्तक्षेप करावा! शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा आणि पिकांच्या नुकसानीचा न्याय्य मोबदला मिळणे हा त्यांचा हक्क आहे. मात्र, हक्काचा मावेजा मागणाऱ्या शेतकऱ्यांनाच खंडणीखोर ठरवण्याचे पाप पोलिस प्रशासनाने करू नये. पवनचक्की कंपन्यांच्या मनमानीला आळा घालून शेतकऱ्यांना न्याय द्यावा. अन्यथा भविष्यात बीड जिल्ह्यात शेतकरी आत्महत्यांच्या घटनांमध्ये वाढ झाल्यास त्याची नैतिक जबाबदारी जिल्हा प्रशासनाने स्वीकारावी, असा इशारा डॉ. गणेश ढवळे यांनी दिला आहे.



काल बीड शहर बचाव मंच च्या सहकारी मित्रांनी स्नेह सावली या लहान मुलांच्या अनाथ आश्रमाला रामनगर, बीड येथे जाऊन सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांच्या अडचणी व तेथील परिस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न केला. याचे संचालक निलेश मोहिते हे स्वबळावर हा अनाथाश्रम चालवतात. नितिन जायभाये यांच्या वतीने लहान मुलांना दिवाळीनिमित्त नवीन शर्ट्स देण्यात आले. यावेळी दिनेशदादा मोंढेकर, डॉ. संजय तांदळे, डॉ. लक्ष्मण पवळ हे देखील उपस्थित होते.

भाटवडगावच्या 'बी.टी. पवार नगर'मध्ये पारंपरिक बंजारा संस्कृतीत साजरी झाली उत्साही दिवाळी



माजलगाव । अखिल शेख

आधुनिकतेच्या युगात आपल्या संस्कृतीचा गोडवा जपताना, माजलगाव तालुक्यातील भाटवडगाव येथील 'बी. टी. पवार नगर'मध्ये यंदाची दिवाळी अत्यंत उत्साहात आणि पारंपरिक बंजारा पद्धतीने साजरी करण्यात आली. या आगळ्या-वेगळ्या उत्सवाने संपूर्ण परिसरात लक्ष वेधून घेतले. बंजारा समाजाची समृद्ध परंपरा, कला आणि संस्कृतीचे जतन करण्याच्या उद्देशाने येथील ग्रामस्थांनी एकत्र येऊन हा दिवाळी सोहळा साजरा केला. उत्सवाचे खास वैशिष्ट्य म्हणजे बंजारा समाजाची पारंपरिक वेशभूषा, आकर्षक आरशांचे भरतकाम केलेले पोशाख (घागरा, कंचुकी) आणि पारंपारिक दागिने परिधान करून महिला व तरुणींनी या उत्सवात सहभाग घेतला.

दिवाळीच्या निमित्ताने पारंपरिक बंजारा लोकगीते, आरत्या आणि पारंपरिक नृत्याने कार्यक्रमात रंगत आणली. लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांनीच या पारंपरिक सणाचा मनसोक्त आनंद घेतला. एकमेकांना दिवाळीच्या शुभेच्छा देत, जुन्या परंपरांना उजाळा देणारा हा सोहळा 'बी. टी. पवार नगर'मधील नागरिकांसाठी अत्यंत आनंदाचा आणि संस्मरणीय ठरला.

पान शॉपच्या नावाखाली बीडमध्ये नशेचा बाजार; FDA आणि पोलीस प्रशासन झोपले आहे का? महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा संतप्त सवाल!

रात्री १२ ते १ वाजेपर्यंत दुकाने सुरू, तरुणाई व्यसनाच्या विळख्यात; पान शॉपची तातडीने तपासणी करून नियमबाह्य दुकाने सील करा

बीड । प्रतिनिधी

बीड शहरामध्ये सध्या मोठ्या प्रमाणावर पान शॉप सुरू असून, यातील काही पान शॉपमध्ये पानाच्या नावाखाली फुलचंद, बाण आणि विविध नावांनी नशा निर्माण करणारे पदार्थ विकले जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. या पदार्थांमध्ये नेमके कोणते घटक वापरले जातात, ते आरोग्यास किती घातक आहेत आणि त्यांची विक्री कायदेशीर आहे का, याची सखोल चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे.

बीड जिल्ह्यातील तरुण पिढी अशा पदार्थांच्या आहारी जात असल्याची गंभीर चिंता निर्माण झाली आहे. तरुणांचे भविष्य धोक्यात येत असताना अन्न व औषध प्रशासन (ऋऊ) नेमके काय करत आहे? शहरातील या पान शॉपची नियमित तपासणी होते की केवळ कागदोपत्री कारभार सुरू आहे? विशेष म्हणजे, बीड शहरातील अनेक पान शॉप रात्री १२ ते १ वाजेपर्यंत सुरू राहत असल्याचे चित्र दिसून येते. मग पोलीस प्रशासन नेमके काय करत आहे? रात्रीची गस्त, कायदा आणि सुव्यवस्था यांची जबाबदारी असताना या दुकानांच्या वेळेवर नियंत्रण का नाही?



पोलीस प्रशासनाला हे प्रकार दिसत नाहीत का? की जाणीवपूर्वक याकडे दुर्लक्ष केले जात आहे? या दुकानांना रात्री उशिरापर्यंत व्यवसाय करण्याची मुभा कोणाच्या आधारावर मिळते? या दुर्लक्षामागे कोणाचे हितसंबंध आहेत का? असे अनेक गंभीर प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

एका बाजूला व्यसनमुक्तीचे संदेश दिले जातात आणि दुसऱ्या बाजूला तरुणाईला नशेच्या विळख्यात ढकलणाऱ्या विक्रीकडे प्रशासन डोळेझाक करत असेल, तर ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची प्रशासनाकडे ठाम मागणी आहे की, बीड शहरातील सर्व पान शॉपची विशेष तपासणी मोहीम तातडीने राबवावी. फुलचंद, बाण व इतर नावांनी विकल्या जाणाऱ्या पदार्थांचे नमुने घेऊन प्रयोगशाळेत तपासणी करावी. प्रतिबंधित, भेसळयुक्त किंवा आरोग्यास घातक घटक आढळल्यास संबंधित विक्रेत्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी. परवाने आणि अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दुकानांवर नियमानुसार सील करण्याची कारवाई करावी. रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या पान शॉपची पोलीस प्रशासनाने विशेष तपासणी करावी आणि निर्धारित वेळेचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करावी. शाळा-महाविद्यालयांच्या परिसरातील अशा दुकानांवर विशेष लक्ष ठेवावे. या संपूर्ण प्रकरणात दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी.

प्रशासनाने एक गोष्ट लक्षात ठेवावी, बीडच्या तरुणाईचे भविष्य धोक्यात येत असताना महाराष्ट्र नवनिर्माण सेना शांत बसणार नाही! या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन प्रत्यक्ष तपासणी आणि ठोस कारवाई करावी. अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्वतः रस्त्यावर उतरून ऋऊ, पोलीस प्रशासन आणि जिल्हा प्रशासनाला जाब विचारल्याशिवाय राहणार नाही.

हा लढा कोणत्याही व्यवसायाच्या विरोधात नसून तरुण पिढीचे भविष्य वाचवण्यासाठी आहे. पानाच्या नावाखाली नशेचा बाजार चालणार असेल आणि प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करणार असेल, तर अशा निष्क्रिय कारभाराला महाराष्ट्र नवनिर्माण सेना कदापि खपवून घेणार नाही! तरुणाई वाचली पाहिजे, व्यसनाची विक्री थांबली पाहिजे आणि दोषींवर कारवाई झालीच पाहिजे!

– ऋषिकेश भैय्या गिराम पाटील
जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना, बीड.

पाटोदा नगरपंचायतीत भगवान बिरसा मुंडा जयंती उत्साहात साजरी

प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मान्यवरांकडून विनम्र अभिवादन; आदिवासी समाजाच्या संघर्षमय इतिहासाला उजाळा

पाटोदा । प्रतिनिधी

क्रांतिसूर्य तथा जननायक भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त पाटोदा नगरपंचायत कार्यालयात जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांनी विनम्र अभिवादन केले. या प्रसंगी लोकनेते सुरेश आण्णा धस यांचे स्वीय सहाय्यक सोमीनाथ दाजी कोल्हे, नगराध्यक्ष राजू भैया जाधव, नगरसेवक श्रीहरी गीते बापू, सभापती



रामेश्वर गोरे, आरोग्य स्वीय सहाय्यक महेश भाऊ बेदरे, अरविंद सरोदे, राऊत, पत्रकार गणेश शेवाळे, श्रीनिवास राऊत यांच्यासह नगरपंचायतीचे पदाधिकारी, कर्मचारी व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वाभिमानासाठी आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी केलेला संघर्ष व दिलेले बलिदान भारतीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदवले गेले आहे. अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देणारे त्यांचे कार्य आजही समाजासाठी मार्गदर्शक आहे, अशा भावना यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केल्या. भगवान बिरसा मुंडा यांचे विचार, संघर्ष आणि त्याग भावी पिढ्यांसाठी सदैव प्रेरणादायी राहतील, अशा भावना व्यक्त करत जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले.

आदरणीय नेतृत्वाकडून आदरातिथ्य; मा.आ. राजेंद्र जगताप यांच्या निवासस्थानी दिपावली मिलन

बीड । प्रतिनिधी

माजी आमदार राजेंद्रजी जगताप यांनी त्यांच्या निवासस्थानी १० नोव्हेंबर २०२६ मंगळवार रोजी दीपावली मिलन कार्यक्रम ठेवला. यात त्यांनी त्यांच्या संपर्कात असलेले सर्व हिंदू-मुस्लिम बांधवांना आवर्जून निमंत्रित केले. आलेल्या प्रत्येकासोबत हस्तांदोलन करून गळा भेट घेत प्रत्येकाची आस्थेने विचारपूस करत सर्वांना दीपावलीच्या शुभेच्छा देऊन फराळ खाऊ घातला.

यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे, जगताप साहेबांचे जुने मित्र मुहम्मद



अब्दुल रऊफ़ आणि त्यांचे पुत्र मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ यांनीही कार्यक्रमात उपस्थित राहून जगताप साहेबांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. जगताप साहेबांच्या या कार्यक्रमात येणाऱ्या मान्यवरांची उपस्थिती पाहून माजी आमदार जगताप साहेब राजकारणातील आदरणीय व्यक्तिमत्व असल्याचा प्रत्यय पुन्हा एकदा प्रत्येकास आला.

सफाई कामगारांचे वास्तव उघड करणारा 'ब्लर कॅनव्हास'



'स्वच्छ भारत' आणि 'स्मार्ट सिटी'च्या घोषणांनी शहरांचे चित्र बदलत असताना, त्याच शहरांचे आरोग्य जपणाऱ्या सफाई कामगारांच्या आयुष्यातील संघर्ष, उपेक्षा आणि आर्थिक विवंचना अधोरेखित करणारा 'ब्लर कॅनव्हास' हा मराठी चित्रपट नुकताच "Praniti Film' या यूट्यूब चॅनेलवर प्रदर्शित झाला आहे.

अबूजर फिल्म्स प्रस्तुत या चित्रपटातून नगरपरिषदेतील सफाई कामगारांचे रखडलेले वेतन, कुटुंबाची उपासमार, सामाजिक अवहेलना आणि व्यवस्थेच्या उदासीनतेचे वास्तव प्रभावीपणे मांडण्यात आले आहे. आता पर्यन्त या चित्रपटाने अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पुरस्कार जिंकले आहेत,तर याच चित्रपटातील मुख्य नायिका सोनाली शहाणे हिला बेस्ट ऍक्टर चा पुरस्कार ही मिळाला आहे. या चित्रपटाची निर्मिती एजाज अली आणि कुलसिन कुलविंदर सिंग यांनी केली असून, दिग्दर्शनाची धुरा प्रवीण वडमारे यांनी सांभाळली आहे. लेखक एजाज अली यांनी अत्यंत परखड संवादांच्या माध्यमातून सफाई कामगारांच्या वेदना आणि त्यांच्या जगण्यातील विदारक वास्तव प्रेक्षकांसमोर आणले आहे.

चित्रपटाचे वैशिष्ट्य म्हणजे सफाई कामगारांना केवळ परिस्थितीचे बळी म्हणून न दाखवता, आपल्या हक्कांसाठी संघटित होऊन संघर्ष करणारा स्वाभिमानी वर्ग म्हणून चित्रित करण्यात आले आहे. सलग आठ-आठ महिने वेतन न मिळाल्याने निर्माण झालेली आर्थिक कोंडी, आजारी वडिलांच्या औषधांचा प्रश्न, मुलांच्या गरजा आणि संसाराचा गाडा चालवताना होणारी परवड या प्रसंगांतून चित्रपटाची कथा पुढे सरकते. अखेरीस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या विचाराने प्रेरित होऊन कामगार आपला लढा लढतात. दिग्दर्शक प्रवीण वडमारे यांनी कोणताही अनावश्यक भावनिक मुलामा न देता वास्तववादी पद्धतीने चित्रपट साकारला आहे. विशेषतः कामगारांचा संघर्ष यशस्वी झाल्यानंतर त्याचे श्रेय घेण्यासाठी पुढे येणाऱ्या राजकीय नेतृत्वाचे चित्रण व्यवस्थेतील दांभिकतेवर भाष्य करणारे ठरते.

महेंद्र खिल्लारे यांनी महें

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचे पशुधन वाचविण्यासाठी तातडीने चारा छावण्या सुरू करा!

मुख्यमंत्री पशुधन योजनेची अंमलबजावणी करा; जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन : डॉ. गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता शेतकऱ्यांचे पशुधन वाचविण्यासाठी तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात, जनावरांसाठी दावणीला चारा उपलब्ध करून द्यावा, तसेच दोन वर्षांपूर्वी घोषित केलेल्या मुख्यमंत्री पशुधन योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी, या मागण्यांसाठी सोमवार, दि.१६ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी निदर्शने करण्यात आली.

सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांना निवेदन देण्यात आले. आंदोलनात शेख युनुस, मुबीन शेख, रामनाथ खोड, सादेक सय्यद (शहराध्यक्ष आम आदमी पार्टी बीड), रफिक पठाण (उपाध्यक्ष आम आदमी पार्टी बीड), रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष इंटक बीड), सामाजिक कार्यकर्ते हनुमान घोडके, भिमराव कुटे (मराठवाडा अध्यक्ष राष्ट्रीय किसान मोर्चा), ज्येष्ठ समाजसेवक डॉ.संजय तांदळे, प्रा.डी.जी.तांदळे (जिल्हाध्यक्ष किसान सभा बीड), सरफराज पठाण, विजय घाडगे, तुकाराम पवार आदी सहभागी होते.



चारा आणि पाण्याअभावी पशुधन संकटात!

बीड जिल्ह्यात अत्यल्प पर्जन्यमान, पावसातील खंड आणि तीव्र पाणीटंचाईमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून जनावरांच्या चारा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे.

शेतीसोबतच पशुधन हा शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा आधार आहे. मात्र, चारा उपलब्ध नसल्याने जनावरांचे संगोपन करणे कठीण झाले आहे. बाजारातून चारा विकत घेणे शेतकऱ्यांना परवडत नसल्याने पशुधन जगवायचे कसे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाने वेळीच उपाययोजना न केल्यास शेतकऱ्यांवर आपली जनावरे कवडीमोल दराने विकण्याची वेळ येण्याची भीती व्यक्त करण्यात आली.

चारा छावण्यांसाठी आठ प्रमुख मागण्या १. दुष्काळी व चारा टंचाईग्रस्त गावांमध्ये तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात. २. चारा छावण्यांसाठी असलेल्या जाचक अटी व कागदपत्रांची प्रक्रिया सुलभ करावी. ३. छावण्यांमध्ये हिरवा व सुका चारा, पिण्याचे पाणी आणि पशुवैद्यकीय सुविधा उपलब्ध कराव्यात. ४. ग्रामपंचायत व स्थानिक प्रशासनाला छावण्यांसाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश द्यावेत. ५. चारा टंचाईग्रस्त गावांचे तातडीने सर्वेक्षण करावे. ६. शेतकऱ्यांना चारा खरेदी अनुदान किंवा चारा डेपोच्या माध्यमातून सवलतीच्या दरात चारा द्यावा. ७. चारा छावण्यांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी पारदर्शक देखरेख यंत्रणा निर्माण करावी. ८. छावण्या सुरू होईपर्यंत पशुपालकांना चारा व पाणी उपलब्ध करून देण्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी.

मुख्यमंत्री पशुधन योजना कागदावरच! दोन वर्षांपासून अंमलबजावणीची प्रतीक्षा

शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसायाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी दोन वर्षांपूर्वी मुख्यमंत्री पशुधन योजना जाहीर करण्यात आली होती. या योजनेंतर्गत गाई, म्हशी, शेळ्या, मेंढ्या व वराहपालनासाठी सर्वसाधारण प्रवर्गातील शेतकऱ्यांना ५० टक्के, तर अनुसूचित जाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना ७५ टक्के अनुदान देण्याचे जाहीर करण्यात आले होते. मात्र, अद्याप या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झालेली नाही. लाभार्थ्यांना अर्ज करता यावा यासाठी आवश्यक असलेले पोर्टलही सुरू झालेले नाही. पोर्टल सुरू होण्यासाठी आणखी दोन ते तीन महिने लागतील, असे पशुसंवर्धन विभागाकडून सांगण्यात येत असल्याने शेतकऱ्यांना योजनेच्या लाभासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे मुख्यमंत्री पशुधन योजनेचे पोर्टल तातडीने सुरू करून पात्र शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभ द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

पशुधन वाचविणे ही शासनाचीही जबाबदारी!

शेतकऱ्यांच्या हातातील शेती पुन्हा उभी करता येऊ शकते; मात्र पशुधन एकदा नष्ट झाले तर शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होणार आहे. त्यामुळे पशुधन वाचविणे ही केवळ शेतकऱ्यांची नव्हे, तर शासनाचीही जबाबदारी आहे. दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनाने कोणतीही दिरंगाई न करता चारा छावण्या सुरू कराव्यात आणि मुख्यमंत्री पशुधन योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी. अन्यथा शेतकरी व पशुपालकांना तीव्र आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा डॉ. गणेश ढवळे यांनी दिला.

मदतीचा हात, माणुसकीची साथ; एकनाथ शिंदे साहेबांच्या मदतीने शेतकऱ्यांच्या घरात आनंदाचा प्रकाश

शेतकऱ्यांची दिवाळी गोड करण्यासाठी बाजीराव चव्हाण यांचा पुढाकार..!

बीड । प्रतिनिधी

शेतकऱ्यांची दिवाळी काळी नव्हे, तर गोड आणि आनंदाची झाली पाहिजे. शेतकऱ्यांच्या घरातही दिवाळीचा दिवा उजळला पाहिजे, त्यांच्या कुटुंबाच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले पाहिजे आणि आर्थिक संकटामुळे कोणत्याही शेतकरी कुटुंबाचा सण अंधारात जाऊ नये, या संवेदनशील भावनेतून जन्मभूमी इमामपूर येथे सामाजिक बांधिलकी जपणारा स्तुत्य उपक्रम उत्साहात संपन्न झाला.



महाराष्ट्र राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या प्रेरणेने, खासदार श्रीकांत शिंदे साहेब तसेच युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, युवासेना मराठवाडा निरीक्षक तथा युवासेना लोकसभा संपर्कप्रमुख बाजीराव दादा चव्हाण यांच्या पुढाकारातून इमामपूर येथील दुष्काळग्रस्त शेतकरी व गरजू नागरिकांना अन्नधान्य किट आणि जीवनावश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले. राजकारण केवळ पद, प्रतिष्ठा आणि सत्तेपुरते मर्यादित नसून समाजातील शेवटच्या घटकाच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्यासाठी असते, याचा प्रत्यय बाजीराव दादा चव्हाण यांच्या या उपक्रमातून आला. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत त्यांच्या सणाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी त्यांनी घेतलेला पुढाकार निश्चितच कौतुकास्पद ठरला.

शेतकरी हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. मात्र निसर्गाच्या लहरीपणामुळे आणि दुष्काळी परिस्थितीमुळे अनेक शेतकरी कुटुंबांना आर्थिक संकटांचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत दिवाळीसारख्या आनंदाच्या सणात त्यांच्या घरातही आनंद निर्माण व्हावा, त्यांना आधार मिळावा आणि आपण एकटे नाही, आपल्या पाठीशी समाज उभा आहे, ही भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. तसेच यावर्षीची माझी दिवाळी ही शेतकऱ्यांच्या कुटुंबासोबतच साजरी झाली असे बाजीराव दादा चव्हाण यांनी म्हटले.

बाजीराव दादा चव्हाण यांनी केवळ मदतीचे साहित्य वाटप करण्यापुरता हा उपक्रम मर्यादित न ठेवता, शेतकऱ्यांच्या सुख-दुःखाशी नाते जोडण्याचा आणि त्यांच्या अडचणींच्या काळात आधार बनण्याचा संदेश दिला. त्यांच्या या संवेदनशील भूमिकेमुळे सामाजिक कार्यातील बांधिलकी, नेतृत्वातील माणुसकी आणि जनसामान्यांप्रती असलेली आस्था अधोरेखित झाली. उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या प्रेरणादायी नेतृत्वातून, खासदार श्रीकांत शिंदे साहेब आणि युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक साहेब यांच्या मार्गदर्शनातून अशा सामाजिक उपक्रमांना बळ मिळत असून, बाजीराव दादा चव्हाण यांच्यासारखे कार्यकर्ते हे विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवत आहेत. समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देत त्यांच्या आयुष्यात आनंद निर्माण करणे, हीच खरी लोकसेवा असल्याचे या उपक्रमातून दिसून आले. शेतकऱ्यांच्या घरात चूल पेटली पाहिजे, त्यांच्या लेकरांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले पाहिजे आणि प्रत्येक शेतकरी कुटुंबाची दिवाळी गोड झाली पाहिजे, हा विचार केवळ शब्दांत न ठेवता कृतीतून साकार करण्याचा प्रयत्न बाजीराव दादा चव्हाण यांनी इमामपूर येथे केला. त्यांच्या या उपक्रमामुळे इमामपूरमध्ये माणुसकीची दिवाळी साजरी झाली असून, सामाजिक जाणीव जपणाऱ्या या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

चौसाळा येथे गुरुदेवांची १४७ वी जन्मजयंती मोठ्या उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

कर्नाटक गजकेसरी, घोर तपस्वी, परम पूज्य गुरुदेव गणेशलालजी म.सा. यांची १४७ वी जन्मजयंती चौसाळा येथे मोठ्या हर्षोल्हासात साजरी करण्यात आली. यानिमित्त गुरुदेवांना कोटी कोटी नमन करण्यात आले. गुरुदेवांनी सन १९५४ मध्ये चौसाळा येथे श्री महावीर गौरक्षण संस्था या नावाने गौशाळेची स्थापना केली होती. आज या संस्थेत ४०० गौमातांचे संगोपन सुरू आहे. गुरुदेवांच्या प्रेरणेतूनच गौसेवा, जीवदया आणि धर्माची ही अनुपम साधना अखंड सुरू आहे.



जन्मजयंती कार्यक्रमाची सुरुवात झेंडावंदनाने झाली. लातूरचे प्रतिष्ठित श्रावक श्री शांतिलालजी बलदोटा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी गुरुदेव प्रार्थना करण्यात आली. समाजातील सर्व वर्गातील श्रावक-श्राविका मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी रोशन खिवंसरा गुरुदेवांप्रती आपले विचार व्यक्त केले. गुरुदेवांचे जीवन, त्यांची अहिंसा, तप, एकता, गौसेवा आणि समाजासाठीचे योगदान याचे स्मरण करण्यात आले व राजेश लोढा यांनी प्रसाद व प्रभावणा वाटप केली. कार्यक्रमाला श्री महावीर गौरक्षण संस्थेचे संपर्क प्रमुख आनंद नहार, ऊमेश लोढा, नितीन लोढा, आनंद लोढा, भुषण खिवंसरा, सुभाष बोरा, अनुप बेदमुथा, संदेश खिवंसरा, मयूर नहार, संतोष लोढा सतिश कोचर, पारस धोका, विनोद धोका व ग्रामस्थ उपस्थित होते.

कंकालेश्वर येथे महाशिवांना कार्तिक पर्वातील दीपोत्सव सोहळा अर्पण तथा संपन्न

कार्तिक पर्वा निमित्त महादेवांना कंकालेश्वर येथे सातत्याने दोन दिवस दिवे लावण्यात आले

बीड । प्रतिनिधी

एक दिवा ज्ञानाचा, एक दिवा भक्तीचा, एक दिवा प्रगतीचा उजळवू सारे विश्व शिवतेजाने शिव कृपेने, अशी प्रेरणा घेऊन बीड शहर बचाव मंचाचे अध्यक्ष श्री नितिनजी जायभाये यांच्या तसेच मित्र, बांधव, भगिनींच्या वतीने शहरातील अनेक प्रतिष्ठित मान्यवरांना तसेच भक्त भाविकांना, विविध सामाजिक संघटनेंच्या सामाजिक कार्यातून सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि खऱ्या अर्थाने मानवीय जीवनाची मूल्य सातत्याने जपवणूक करणाऱ्या बांधवांना भगिनींना सोबत घेऊन बीड जिल्ह्याचे ऐतिहासिक व आध्यात्मिक वैभव असलेले अनादि, आराध्य दैवत श्री महाशिव महादेव यांना कंकालेश्वर मंदिर येथे अध्यात्मिक दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व असलेल्या कार्तिक पर्वातील दीपावली पाडव्यानिमित्त सातत्याने दोन दिवस संध्याकाळी सामूहिक रीतीने दीप प्रज्वलानाचा व दीप अर्पणाचा कार्यक्रम संपन्न करण्यात आला.



यावेळी शहरातील असंख्य भक्त भाविकांच्या सह सामाजिक कार्यकर्त्यांनी दिवे लावण्याचा कार्यक्रम केला. अशा पद्धतीने दिवे लावून सामाजिक एकोपा जपत आध्यात्मिक, धार्मिक, सांस्कृतिक वारसा जतन करण्याचे शुभ कार्य करण्यात आले. यावेळी नितिन जायभाये यांच्यासह कंकालेश्वर देवस्थानचे संजय गुरव आणि समस्त परिवार, गुरु आनंद प्रतिष्ठानच्या सीमाताई ओस्तवाल, पत्रकार तथा सूत्रसंचालिका आरतीताई परळकर, सांस्कृतिक विभाग प्रमुख अमोलजी अंकुटे, संतोष भाऊ हरणमारे, विजय काका बुरांडे, रेणुकाताई डांगे, प्रकाश गाढे, संपादक सदाशिव पवळ, दिनेशदादा मोंढेकर, पत्रकार किशोर कुलकर्णी, कृष्णाभाऊ सुरवसे, रुपेश भैय्या बुंदेले, श्यामराव मार्कंडे सर, संस्कार भारतीचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत सौंदतीकर, उद्योजक विपिन देशपांडे, पत्रकार तथा संपादक वैभवजी स्वामी, शीलाताई मुंडे, अभिजीत वैद्य, राजू वंजारे, राणीताई गुलरूख जहीन शेख, शिवसंग्राम चे हरिशचंद्र ठोसर, संभाजी महाराज गुरव परिवार, प्रशांतभाऊ बोंदार्डे आणि परिवार, डॉक्टर संजय तांदळे, बाजीराव ढाकणे, बाळासाहेब नागरगोजे यांच्यासह आदी शहरातील असंख्य भक्तजण परिवार या दीपोत्सवात सहभागी होता. या दीपोत्सव शुभ प्रसंगाचे औचित्य साधत दिग्दर्शक अमोल अंकुटे यांनी त्यांच्या नवीन अल्बम च्या गीतांचे सर्व मान्यवरांच्या हस्ते प्रथम प्रदर्शन केले.

प्रा.जीजो पी. थॉमस यांचा 'बेस्ट नर्सिंग डिमिनिस्ट्रेटर' पुरस्काराने सन्मान!

पुणे । प्रतिनिधी

वैद्यकीय सेवा, गुणवत्ता नियंत्रण आणि नर्सिंग प्रशासनात आपल्या उल्लेखनीय कर्तृत्वाने वेगळा ठसा उमटवणारे सिम्बायोसिस युनिव्हर्सिटी हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, पुणे येथील नर्सिंग उपव्यवस्थापक श्री. जीजो पी. थॉमस यांना 'नर्सिंग हॉरायझन्स जर्नल'तर्फे अत्यंत प्रतिष्ठेचा 'बेस्ट नर्सिंग डमिनिस्ट्रेटर अवॉर्ड २०२६' देऊन गौरविण्यात आले आहे. मुंबई येथे आयोजित दिमाखदार सोहळ्यात त्यांच्या नर्सिंग क्षेत्रातील उत्कृष्ट नेतृत्व, रुग्ण सुरक्षितता आणि प्रशासकीय योगदानाबद्दल हा सन्मान प्रदान करण्यात आला.

शैक्षणिक गुणवत्ता आणि अखंड ज्ञानसाधना

१५ वर्षांहून अधिक काळ रुग्णसेवा आणि आरोग्य, नर्सिंग प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव असणाऱ्या श्री. जीजो पी. थॉमस यांनी नुकतेच सिम्बायोसिस कॉलेज ऑफ नर्सिंग (सिम्बायोसिस इंटरनॅशनल अभिमत विद्यापीठ, पुणे) येथून एम.एससी. नर्सिंग (मेडिकल-सर्जिकल / क्रिटिकल केअर) ही पदव्युत्तर पदवी ७७ % गुणांसह यशस्वीरीत्या पूर्ण केली असून या परीक्षेत त्यांनी विद्यापीठात तृतीय क्रमांक पटकावून आपल्या शैक्षणिक गुणवत्तेचा झेंडा फडकावला. याशिवाय त्यांनी आयसीएफएआय विद्यापीठातून हॉस्पिटलबद्दलचे 'एमबीए' , बी.एससी. नर्सिंग, हॉस्पिटल मॅनेजमेंटमधील डिप्लोमा आणि नर्सिंग डमिनिस्ट्रेशनचा विशेष कोर्स पूर्ण केला आहे.

वर्ष २०२६ मधील मानाचे पुरस्कार व गौरव

जीजो पी. थॉमस यांच्या नेतृत्वगुणांची आणि उत्कृष्ट सेवेची दखल घेत २०२६ या एकाच वर्षात त्यांना अनेक राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. बेस्ट नर्सिंग डमिनिस्ट्रेटर अवॉर्ड २०२६-२०२६: नर्सिंग हॉरायझन्स जर्नलकडून २४ ऑक्टोबर २०२६रोजी मुंबई येथे संस्थापक अध्यक्ष सुभानंद शिंदे सर, डॉ. सोनोपंत जोशी सर आणि देशभरातील सर्व प्रेरणादायी, मान्यवर निवडकर्ते यांच्या मुख्य हस्ते निवड आणि पुरस्कार प्रदान, बेस्ट नर्स अवॉर्ड २०२६: जीआयएआर (ऋख-ठ) फाउंडेशनतर्फे आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनानिमित्त विशेष सन्मान, बेस्ट नर्स मॅनेजर अवॉर्ड २०२६: 'ट्रेंड नर्सेस असोसिएशन ऑफ इंडिया' (TNAI), पुणे शाखेकडून परिचारिका दिनानिमित्त गौरव. संशोधन सादरीकरणात प्रथम क्रमांक: 'क्रिटिकल केअर नर्सेस सोसायटी' (CCNS) कॉन्फरन्स २०२६ मध्ये संशोधन निबंध सादरीकरणात प्रथम पारितोषिक.

गुणवत्ता नियंत्रण आणि रुग्ण सुरक्षिततेचे खंदे पुरस्कर्ते

राष्ट्रीय स्तरावरील गुणवत्ता मानकांसाठी NABH Assessor (नॅशनल क्रिडिटेशन बोर्ड फॉर हॉस्पिटल्स) म्हणून श्री.जीजो थॉमस अधिकृतपणे पॅनेलवर कार्यरत आहेत. NABH मूल्यांकन, क्लिनिकल ऑडिट्स आणि 'कोड ब्लू' आणीबाणीच्या नियोजनासाठी स्थापन केलेल्या उझठ कमिटीचे सचिव म्हणून ते महत्त्वाची धुरा सांभाळत आहेत. रुग्णांच्या तब्येतीतील बदल वेळेत ओळखून प्राणांतिक आणीबाणी (Code Blue) टाळण्यासाठी त्यांनी मॉडिफाइड अर्ली वॉर्निंग साईन (MEWS) वर केलेले संशोधन अत्यंत मार्गदर्शक ठरले आहे.सिम्बायोसिस हॉस्पिटलच्या स्थापनेपासूनच नर्सिंग सेवेचा विस्तार, नवीन युनिट्सचे कमिशनिंग आणि उच्च दर्जाची सेवा प्रणाली विकसित करण्यात त्यांचा मोलाचा वाटा राहिला आहे.

रुग्णसेवा आणि निरंतर शिक्षण हेच ध्येय

आपल्या भावना व्यक्त करताना श्री. जीजो पी. थॉमस म्हणाले, हे सर्व पुरस्कार आणि सन्मान म्हणजे केवळ माझे यश नसून रुग्णसेवेसाठी दिलेल्या योगदानाची सर्व सहकाऱ्यांची, सर्व नर्सिंग ऑफिसर्स यांच्या कार्याची, पुढील जबाबदारीची पावती आहे. नर्सिंग क्षेत्रातील नवीन पिढीला मार्गदर्शन करणे, रुग्णांची सुरक्षितता सर्वोच्च ठेवणे आणि आरोग्य सेवेचा दर्जा सातत्याने उंचावणे यासाठी मी सदैव कटिबद्ध राहीन. त्यांच्या या अभूतपूर्व यशाबद्दल सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय युनिव्हर्सिटी हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर चे सर्व माजी मुख्य व्यवस्थापक जेसी भिडे मॅडम, प्रेसी मॅडम, नवनियुक्त मुख्य व्यवस्थापक जेसिल्डा मॅडम, शस्त्रक्रिया विभाग मॅनेजर इम्रान अली चौहान सर आणि संपूर्ण व्यवस्थापन टीम, सर्व डॉक्टर, सर्व नर्सिंग ऑफिसर्स आणि संपूर्ण वैद्यकीय वर्तुळातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे अशी माहिती अनिल जायभाये बीडकर यांनी दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बीड जिल्हा अल्पसंख्याक विभाग उपअध्यक्षपदी वाजेदखान पठाण यांची निवड!

माजलगाव । अखिल शेख

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अल्पसंख्याक विभागाच्या संघटनात्मक बांधणीत एक महत्त्वपूर्ण घडामोड समोर आली असून, बीड जिल्ह्याच्या अल्पसंख्याक विभागाच्या उपअध्यक्षपदी लुखेगाव (ता. माजलगाव, जि. बीड) येथील वाजेदखान खुदायतखान पठाण यांची अधिकृत निवड करण्यात आली आहे. पक्षाच्या वतीने नियुक्ती पत्र देताना त्यांना या नवीन जबाबदारीबद्दल हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या असून, त्यांच्या या निवडीमुळे राजकीय वर्तुळातून व पक्षाच्या कार्यकर्त्यांमधून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. नियुक्ती पत्र व प्रमुख नेत्यांचे मार्गदर्शन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अल्पसंख्याक विभाग, बीड जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष, शेख निजाम जैनोद्दीन यांनी वाजेदखान पठाण यांना नियुक्ती पत्र प्रदान केले. या नियुक्ती पत्रामध्ये पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या विचारांचा आणि मार्गदर्शनाचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे.



पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार, प्रदेश अध्यक्ष खा. सुनील तटकरे, अल्पसंख्याक विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष अँड. सय्यद जलालुद्दीन, माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे, माजी मंत्री तथा आमदार प्रकाशदादा सोळंके, आमदार विजयसिंह पंडित, अल्पसंख्याक प्रदेश अध्यक्ष नाजेर काझी आणि बीड जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चौहान यांच्या मार्गदर्शनाखाली ही संघटनात्मक धुरा सांभाळण्याचे नमूद करण्यात आले आहे.

धर्मनिरपेक्ष विचारांचा प्रसार आणि पक्ष बळकटीकरण

शिव, फुले, शाहू, आंबेडकर आणि मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्या विचारसरणीवर आणि धर्मनिरपेक्ष विचारांवर आधारित राजकारण तळागाळापर्यंत पोहोचवण्याची मोठी जबाबदारी आता वाजेदखान पठाण यांच्यावर आली आहे. समाजातील सर्व घटकांना एकत्र घेऊन, पक्षाचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवून पक्ष संघटना अधिक बळकट करतील, असा विश्वास पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. तसेच, जिल्हा आणि शहरात निर्विवाद पक्ष संघटना उभी करण्यासाठी ते प्रामाणिकपणे प्रयत्न करतील,अशी अपेक्षाही पत्रामध्ये व्यक्त करण्यात आली आहे.

परिसरातून व कार्यकर्त्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव

वाजेदखान पठाण यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अल्पसंख्याक विभाग बीड जिल्हा उपअध्यक्षपदी निवड झाल्यामुळे माजलगाव तालुका व लुखेगाव परिसरात आनंदाचे वातावरण आहे. विविध सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी, तसेच पक्षाच्या कार्यकर्त्यांनी त्यांची भेट घेऊन त्यांना पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीस आणि कार्यासाठी मनापासून शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी सत्कार करताना माजलगाव राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट चे शहराध्यक्ष खलील पटेल, संपादक आयुबखान, राष्ट्रवादी युवा नेते मोबीन पठाण, फेरोज इनामदार, संपादक सुभाष नाकलगावकर, माजी सरपंच राजेंद्र मुसळे, सरपंच दत्तात्रय कोकाटे, सय्यद जलील, डॉक्टर तोफिक पठाण, फारुख पटेल, निसार पटेल, आदिल पठाण, एजास पटेल, फेरोज पठाण, सिराज शेख, असिम सय्यद, सलीम शेख, अन्सारी अन्वर, नारायण घनघाव, संतोष घनघावसह इतर यांनी यावेळी सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहे.

जिथे लोक बोलत राहिले तिथे लेकीने कामाने उत्तर दिले; संघर्षातून आलेली शुभांगी धस

आयुष्य कधी कोणाला कोणत्या वळणावर आणून ठेवेल सांगता येत नाही. काही जणांच्या वाट्याला सुरुवातीपासूनच संघर्ष येतो, तर काहींना अचानक आलेल्या दुःखाच्या धक्क्यातून स्वतःला सावरून नवीन आयुष्य उभं करावं लागतं. पप्पा गेल्यानंतर घर सावरणं, स्वतःला सावरणं आणि तरीही चेहऱ्यावर हसू ठेवून जगासमोर उभं राहणं, हे सगळ्यांनाच जमत नाही. परळी वैजनाथच्या शुभांगी धस (फिटनेस कोच, बॉस फिटनेस) यांची हीच कहाणी आहे- एका खऱ्या योद्ध्याची, जिने एकाकीपणाचे व दुःखाचे डोंगर पेलत, अपयशावर मात करत आणि समाजाच्या रोषाला न जुमानता स्वतःची एक वेगळी व लख्ख ओळख निर्माण केली आहे.

बालपण आणि पोलीस भरतीचे अर्धवट राहिलेले स्वप्न

शुभांगी यांचे बालपण व शालेय शिक्षण परळी वैजनाथ येथील जगमित्र नागा विद्यालयात झाले. लहानपणापासूनच त्यांना खेळाची आणि धावपळीची प्रचंड आवड होती. शाळेच्या ग्राउंडवर धावताना त्यांना स्वतःची खरी ओळख सापडल्यासारखं वाटे. आयुष्यात काहीतरी मोठं आणि कर्तृत्ववान करून दाखवण्याची जिद्द त्यांच्या मनात तेव्हापासूनच रुजली होती. त्यानंतर त्यांनी वैद्यनाथ कॉलेज, परळी वैजनाथ येथून बी.कॉम चे शिक्षण पूर्ण केले.

प्रत्येक तरुण-तरुणीप्रमाणे शुभांगी यांचेही एक स्वप्न होते-पोलीस भरती करून देशाची सेवा करणे, अंगावर युनिफॉर्म चढवणे आणि आई-वडिलांचे नाव रोशन करणे. या स्वप्नासाठी त्यांनी साई अकॅडमीमध्ये अहोरात्र घाम गाळला. पहाटे ५ वाजता उठून प्रॅक्टिस करणे, कठोर मेहनत घेणे हा त्यांचा रोजचा शिरस्ता होता. परंतु, परिस्थिती नेहमी माणसाच्या मनासारखी नसते. काही अपरिहार्य हालातामुळे त्यांना पोलीस भरतीचे हे स्वप्न अर्धवट सोडावे लागले. स्वप्न डोळ्यांसमोर तुटताना पाहणे अत्यंत वेदनादायी होते. अनेकांना वाटले की इथेच सर्व संपले, पण शुभांगी या माघार घेणाऱ्यांपैकी नव्हत्या. त्यांनी स्वतःशीच ठरवले- मी शब्दांनी नाही, कामाने उत्तर देणार!

आयुष्यातील सर्वात मोठा आघात, एकाकी संघर्ष आणि 'पप्पांचे' संस्कार

ज्यांच्या आयुष्यातून वडिलांचं छत्र हरवतं, ती मुलं वेळेआधीच मोठी होतात; ती रडत बसत नाहीत, तर परिस्थितीशी लढतात. आयुष्यात उभं राहण्याचा प्रयत्न करत असतानाच शुभांगी



यांच्यावर सर्वात मोठा आघात झाला-त्यांच्या वडिलांचे निधन झाले. पप्पांच्या जाण्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. ज्यांच्या खांद्यावर संपूर्ण जग होतं, तो आधारच निघून गेला आणि जग अंधारून आल्यासारखे वाटले. पप्पा गेल्यानंतर स्वतःला सावरणं अजिबात सोपं नव्हतं. लोक फक्त बोलतात, पण ज्याच्यावर ओढवतं, त्यालाच ते किती जड असतं याची जाणीव असते. त्या कठीण काळात रडायला आणि सावरायला सोबत कोणी नव्हते. शुभांगी एकटीच रडल्या आणि एकटीनेच स्वतःला व घराला सावरले. कोणी विचारलं, कशी आहेस? तर त्या चेहऱ्यावर हसू आणून ठीक आहे म्हणायच्या; पण आतून त्या किती तुटल्या होत्या, हे फक्त त्यांना आणि त्यांच्या देवालाच ठाऊक होते.

अशा अत्यंत बिकट प्रसंगी वडिलांचे शब्द आणि त्यांचे संस्कार त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. पप्पांनी त्यांना शिकवलं होतं- बाळा, कधीच हार मानायची नाही. माझी लेक कधीच हार मानणार नाही. हाच विचार त्यांची सर्वात मोठी ताकद बनला. एकटेपणाचा आणि दुःखाचा बाऊ न करता, त्यांनी आपले अश्रू घामात बदलण्याचे ठरवले. त्यांनी जिममध्ये पाऊल ठेवले आणि तीच जिम त्यांच्यासाठी एक मंदिर आणि आत्मबल मिळवण्याचे ठिकाण बनली.

समाजाचा विरोध आणि 'बॉस फिटनेस'ची स्थापना

मुलगी होऊन जिममध्ये काय करणार? बाई माणूस जिम कशी चालवणार? अशा अनेक टोमण्यांचा आणि समाजाच्या संकुचित नजरेचा त्यांना सामना करावा लागला. पण एकटी असूनही त्या घाबरल्या नाहीत की डगमगल्या नाहीत. कोणाच्याही टीकेकडे लक्ष न देता, स्वतःला शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या अधिक मजबूत बनवत त्यांनी 'बॉस फिटनेस' (Boss Fitness, Parli Vaijanath) ची स्थापना केली.

आज या प्रवासाला ५ वर्षे पूर्ण झाली आहेत. परळी वैजनाथच्या या लेकीने केवळ स्वतःचेच आयुष्य बदलले नाही, तर आज हजारो महिलांना आणि मुलींना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी प्रेरित केले आहे. ज्या महिला कधी घराबाहेर पडल्या नव्हत्या, त्या आज आत्मविश्वासाने जिममध्ये येऊन स्वतःच्या आरोग्याची काळजी घेत आहेत.

फिटनेस कोच शुभांगी धस


आज पूर्ण बीड जिल्ह्यात 'परळी वैजनाथची पोरगी - शुभांगी धस - बॉस फिटनेस' हे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. मी फक्त शरीर नाही बनवत, मी आत्मविश्वास बनवते. मी फक्त वजन कमी करायला शिकवत नाही, तर स्वतःवर प्रेम करायला शिकवते. हे त्यांचे विचार आज अनेक तरुण-तरुणींसाठी दीपस्तंभ ठरत आहेत. पोलीस भरतीचे स्वप्न अपूर्ण राहिले तरी चालेल, पण जिद्द कायम ठेवली तर माणूस आयुष्याच्या प्रत्येक क्षेत्रात जिंकू शकतो, हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवले आहे.

वडिलांना समर्पित यश आणि पुढचा प्रवास

आज आपले यश आणि

बीड जिल्हा परिषद सीईओंना सत्तेची धुंदी; गुन्हा दाखल करायचा तर करा, मी परवानगी देणारच!

चौकशी समितीचा अहवाल धाब्यावर; पात्र कंत्राटदाराला अपात्र ठरवणाऱ्या सरपंचाची सीईओंकडून पाठराखण!



बीड । प्रतिनिधी

तुम्हाला काय करायचे ते करा, माझ्यावर गुन्हा दाखल करायचा असेल तर करा, मी बांधकाम परवानगी देणारच! नमस्कार, तुम्ही जाऊ शकता... ही भाषा कोणत्याही गुंडाची नसून, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांची आहे! बीड तालुक्यातील भवानवाडी ग्रामपंचायतीच्या ई-निविदा प्रक्रियेत सरपंचाने केलेला पक्षपातीचा 'झोल' पंचायत समितीच्या चौकशी समितीने पुराव्यानिशी उघडकीस आणला आहे. मात्र, या भ्रष्टाचारावर कारवाई करण्याऐवजी न्याय मागण्यासाठी गेलेल्या तक्रारदारांनाच सीईओ जितीन रहमान यांनी अरेरावीची भाषा वापरून हाकलून लावल्याने बीडच्या प्रशासकीय वर्तुळात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

बीड तालुक्यातील मौजे भवानवाडी ग्रामपंचायतीअंतर्गत गावातील स्मशानभूमी शेड बांधकाम आणि मुंडे वस्ती येथील अंगणवाडी इमारत बांधकाम या दोन कामांसाठी ई-निविदा काढण्यात आल्या होत्या. या प्रक्रियेविरोधात ग्रामपंचायत सदस्य अमोल शिवाजी शिंदे, हनुमंत मनोहर जगताप आणि कंत्राटदार विठ्ठल भगवानराव तावरे यांनी तक्रार दाखल केली होती. त्यानुसार बीड पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी १९



मे २०२६ रोजी चार सदस्यीय चौकशी समिती नेमली होती. या चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालात सरपंचाच्या मनमानी कारभाराचा बुरखा फाडला आहे. जुन्या निविदेला केवळ एकच प्रतिसाद मिळाल्याने ती रद्द करणे बंधनकारक होते. मात्र, ती रद्द न करताच ०४ एप्रिल २०२६ ते ०९ एप्रिल २०२६ दरम्यान पुन्हा नव्याने ई-निविदा मागवण्यात आल्या. नव्या निविदेत ६ कंत्राटदारांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी ४ जणांना पात्र ठरवून सत्यजीत भाऊसाहेब डावकर (मुदतबाह्य प्रमाणपत्र) आणि विठ्ठल भगवानराव तावरे यांना अपात्र ठरवले गेले. धक्कादायक बाब म्हणजे, तावरे यांनी सर्व कागदपत्रे वेळेत व नियमानुसार अपलोड केली होती, हे पंचायत समितीच्या पडताळणीत स्पष्ट झाले आहे. तरीही सरपंचाने 'कागदपत्रे दाखल केली नाहीत' असे खोटे कारण दाखवून त्यांना जाणीवपूर्वक अपात्र ठरवले. ही संपूर्ण निविदा प्रक्रिया सरपंच आणि ग्रामसेवक यांच्या संयुक्त 'डिजिटल की'ने होणे अपेक्षित असताना, सरपंचाने परस्पर स्वतःच्या 'डिजिटल की'चा वापर करून हा सर्व घोळ घातल्याचे चौकशी अहवालात सिद्ध झाले आहे.

सीईओंची अरेरावी; लोकशाही उरली आहे की नाही?

पंचायत समितीच्या चौकशी समितीने या दोन्ही ई-निविदांमध्ये स्पष्टपणे अनियमितता झाल्याचा ठपका ठेवला आहे. हाच अहवाल घेऊन तक्रारदार जेव्हा बीड जिल्हा परिषदेचे सीईओ जितीन रहमान यांच्याकडे न्यायाची अपेक्षा घेऊन गेले, तेव्हा सीईओंनी तक्रारदारांचे म्हणणे ऐकून घेण्याऐवजी सत्तेची धुंदी दाखवली.? मी बांधकाम परवानगी देणार आहे, तुम्हाला काय करायचे ते करा, माझ्यावर गुन्हा दाखल करायचा असेल तर करा, अशी उद्धट आणि बेजबाबदार भाषा त्यांनी वापरल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.

भवानवाडीतील ग्रामस्थ आणि सुजाण नागरिकांकडून प्रशासनाला सवाल..

जर जिल्ह्याचे सर्वोच्च प्रशासकीय अधिकारीच चौकशी अहवालाला केराची टोपली दाखवून भ्रष्ट कारभाराला अभय देणार असतील आणि सामान्य नागरिकांना गुन्हा दाखल करण्याची धमकी देणार असतील, तर जिल्ह्यात लोकशाही आणि कायद्याचे राज्य शिल्लक आहे की नाही? असा संतप्त सवाल आता भवानवाडीतील ग्रामस्थ आणि सुजाण नागरिक विचारत आहेत. या मुजोर अधिकाऱ्याची आणि भ्रष्ट सरपंचाची वरिष्ठ पातळीवरून तात्काळ चौकशी होऊन कारवाई होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

धारूरमध्ये जमीन विक्री व्यवहारावरून खळबळ!

न्यायालयीन व महसुली प्रकरण प्रलंबित असताना १० आर जमिनीची विक्री; घोषणापत्रात खोटी माहिती दिल्याचा आरोप

लिहून देणार व लिहून घेणार या दोघांवर कठोर कारवाई करण्याची इफ्तेखार काझी यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील मौजे धारूर येथील सर्वे नं. ६२४/२ मधील १० आर जमिनीच्या विक्री व्यवहारावरून आता मोठा वाद निर्माण झाला आहे. संबंधित जमिनीबाबत महसुली अपील व न्यायालयीन प्रकरणाची पार्श्वभूमी असताना दिनांक १६ जून २०२६ रोजी दस्त क्रमांक १००६/२०२६ अन्वये जमिनीची विक्री करण्यात आली. या व्यवहारादरम्यान नोंदणी कार्यालयात सादर केलेल्या घोषणापत्रात कोणताही न्यायालयीन दावा प्रलंबित नसल्याचे तसेच कोणताही मनाई हुकूम नसल्याचे नमूद करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणी इफ्तेखार मुरादोद्दीन काझी यांनी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करून संपूर्ण व्यवहाराची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. तक्रारीनुसार, उपजिल्हाधिकारी (सामान्य), बीड यांनी



दिनांक ११ ऑगस्ट २०२१ रोजी संबंधित जमिनीबाबत आदेश पारित केला होता. या आदेशाविरुद्ध संजीत जगन्नाथ कोमटवार व इतरांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम २४७ अन्वये अपर जिल्हाधिकारी कार्यालय, अंबाजोगाई येथे अपील दाखल केले होते. विशेष म्हणजे, अपर जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक २२ फेब्रुवारी २०२२ रोजी तहसीलदार, धारूर यांना पत्र देऊन अपील व स्थगिती अर्जावरील निर्णय होईपर्यंत उपजिल्हाधिकारी यांच्या आदेशाच्या अंमलबजावणीस स्थगिती दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

असे असताना संबंधित जमिनीची १० आर क्षेत्राची विक्री करण्यात आली. विक्री दस्तासोबत सादर करण्यात आलेल्या घोषणापत्रात न्यायालयीन दावा किंवा मनाई हुकूम नसल्याचे नमूद असल्याने या घोषणापत्राची सत्यता तपासण्याची मागणी तक्रारदारांनी केली आहे. स्वतः संबंधित जमिनीबाबत अपील दाखल केलेले असताना विक्रीच्या वेळी प्रकरणाची माहिती लपविण्यात आली होती का, हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

संबंधित विक्री व्यवहारात लिहून देणार व लिहून घेणार या दोन्ही पक्षकारांना जमिनीवरील वादाची माहिती देण्यात आली होती का, घोषणापत्रातील माहिती पूर्ण व सत्य होती का आणि नोंदणी कार्यालयाची दिशाभूल करण्यात आली का, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. नोंदणी अधिनियम १९०८ मधील कलम ८२ च्या अनुषंगानेही या प्रकरणाची तपासणी करण्याची मागणी तक्रारीत करण्यात आली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विक्री दस्त, घोषणापत्र, महसुली अपीलाची कागदपत्रे आणि अपर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पत्राची पडताळणी करावी. खोटी माहिती देणे, वस्तुस्थिती लपविणे किंवा कायद्याचे उल्लंघन झाल्याचे निष्पन्न झाल्यास दस्त क्रमांक १००६/२०२६ मधील लिहून देणार व लिहून घेणार या दोन्ही पक्षकारांविरुद्ध सक्षम प्राधिकरणामार्फत कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी इफ्तेखार मुरादोद्दीन काझी यांनी केली आहे. या प्रकरणात जिल्हाधिकारी प्रशासन नेमकी काय भूमिका घेते, संबंधित विक्री व्यवहाराची चौकशी होते का आणि घोषणापत्रातील माहितीची सत्यता तपासून दोषींवर कारवाई होते का, याकडे धारूरमधील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

माजलगाव धरणात १९.७१ टक्के उपयुक्त साठा

बीड जिल्ह्यातील प्रकल्पांमध्ये केवळ ११ टक्के पाणीसाठा शिल्लक

माजलगाव । अखिल शेख

बीड जिल्ह्यातील मोठ्या, मध्यम आणि लघु प्रकल्पांचा १२ नोव्हेंबर २०२६ रोजीचा पाणीसाठा अहवाल प्राप्त झाला आहे. या अहवालानुसार संपूर्ण बीड जिल्ह्यातील जलप्रकल्पांमध्ये सद्यस्थितीत केवळ ११.११ टक्के इतकाच उपयुक्त पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. जिल्ह्यातील एकमेव मोठा प्रकल्प असलेल्या माजलगाव धरणाची उपयुक्त पाणीसाठा क्षमता ३१२ दशलक्ष घनमीटर असून आजमितीस या धरणामध्ये ६१.५ दशलक्ष घनमीटर म्हणजेच १९.७१ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. मागील आठवड्याच्या तुलनेत या साठ्यात घट

झाली असून गेल्या आठवड्यात हा साठा ६५ दशलक्ष घनमीटर इतका होता. बीड जिल्ह्यातील एकूण १७ मध्यम प्रकल्पांची उपयुक्त पाणीसाठा क्षमता १६७.०४ दशलक्ष घनमीटर असून सध्या या प्रकल्पांमध्ये केवळ १३.६६ दशलक्ष घनमीटर म्हणजेच ८.१८ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. या मध्यम प्रकल्पांपैकी ऊर्ध्व कुंडलिका धरणात १५.८७ टक्के, कुंडलिका धरणात १७.३७ टक्के, मेहकरी धरणात १२.४० टक्के, तर वाण धरणात ११.४१ टक्के उपयुक्त साठा उपलब्ध आहे.



बिंदुसरा वाणि सिंदफणा या धरणांमध्ये अनुक्रमे केवळ २.८१ व ०.३८ टक्के पाणीसाठा असून बेलपारा, महासांगवी, कडा, कडी आणि

आणि रुटी यांसह अनेक मध्यम प्रकल्प पूर्णपणे कोरडे पडले आहेत. याव्यतिरिक्त जिल्ह्यातील १४६ लघु प्रकल्पांची एकूण पाणीसाठा क्षमता २८८.४९ दशलक्ष घनमीटर असली तरीही आजघडीला या सर्व लघु प्रकल्पांमध्ये मिळून फक्त १०.१२ दशलक्ष घनमीटर म्हणजेच अवघा ३.५१ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. एकूणच जिल्ह्यातील सर्व मोठे, मध्यम आणि लघु प्रकल्प मिळून ७६७.५३ दशलक्ष घनमीटर क्षमतेपैकी केवळ ८५.२९ दशलक्ष घनमीटर उपयुक्त पाणीसाठा उरला आहे. दिवसेंदिवस पाणीसाठ्यात होणारी घट पाहता नागरिकांनी पाण्याचा अत्यंत काटकसरीने वापर करणे गरजेचे आहे.

बीड जिल्ह्यातील बोअरवेल निर्बंध उठवा : नुमान चाऊस

बीड । प्रतिनिधी



जिल्ह्यातील भूजल पातळी खालावत असल्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने २ नोव्हेंबर २०२६ पासून नवीन बोअरवेल व विहिरी खोदण्यासाठी निर्बंध लागू केले आहेत. या निर्णयामुळे शेतकरी आणि पाणीटंचाईने त्रस्त सामान्य नागरिकांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. मौलाना आझाद युवा मंचचे जिल्हाध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी या निर्णयाचा पुनर्विचार करून निर्बंध उठविण्याची मागणी केली आहे.

भूजल संरक्षण आवश्यक असले तरी शेतकऱ्यांना पिके, फळबागा आणि जनावरे वाचविण्यासाठी पाण्याची गरज आहे. त्यामुळे गावनिहाय भूजल परिस्थितीचा अभ्यास करून निर्बंध उठवावेत किंवा आवश्यक त्या ठिकाणी शिथिल करावेत. तसेच गरजू शेतकरी आणि पिण्याच्या पाण्यासाठी अडचणीत असलेल्या कुटुंबांना विशेष सवलत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. भूजल संरक्षणाला आमचा विरोध नाही; मात्र त्याच्या नावाखाली शेतकरी आणि सामान्य नागरिकांच्या पाण्याच्या गरजांकडे दुर्लक्ष होता कामा नये. जिल्हाधिकाऱ्यांनी जनतेच्या अडचणी लक्षात घेऊन बोअरवेल निर्बंध तातडीने उठवावेत किंवा शिथिल करावेत, अशी ठाम मागणी मौलाना आझाद युवा मंचचे जिल्हाध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी केली आहे.

परिवर्तन पतसंस्थेच्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात किसान मिसाळ यांना दुहेरी दिलासा!

दोन स्वतंत्र गुन्ह्यांत अटकपूर्व जामीन मंजूर; माजलगाव अतिरिक्त सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण आदेश

माजलगाव । अखिल शेख

परिवर्तन अर्बन मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाने माजलगाव तालुक्यात चर्चेला उधाण आले असतानाच या प्रकरणातील किसान नागोराव मिसाळ यांना न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. पतसंस्थेशी संबंधित दोन स्वतंत्र गुन्ह्यांत माजलगाव येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने त्यांचे अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केले आहेत.

माजलगाव शहर पोलिस ठाण्यात दाखल गुन्हा क्रमांक २१२/२०१८ मध्ये तक्रारदार निळकंठ पंडितराव बिंदू यांनी स्वतःच्या व कुटुंबीयांच्या नावे पतसंस्थेत सात लाख २५ हजार रुपयांच्या ठेवी ठेवल्याची तक्रार केली होती. ठेवींची मुदत संपल्यानंतर रक्कम मिळविण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात गेले असता कार्यालय बंद असल्याचे आढळल्याने त्यांनी न्यायालयात धाव घेतली होती.

तर दुसऱ्या गुन्ह्यात स्वप्निल श्रीमंतराव डोंगरे यांनी स्वतःच्या व कुटुंबीयांच्या वतीने पतसंस्थेत १० कोटी ८० लाख ६१ हजार २८३ रुपयांच्या ठेवी ठेवल्याचे न्यायालयीन आदेशात नमूद आहे. या प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४२२/२०१८ दाखल करण्यात आला होता. दोन्ही प्रकरणांत फसवणूक, विश्वासघात, बनावट कागदपत्रे आणि कटकारस्थानासह एमपीआयडी कायद्यांतर्गत गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. अटकपूर्व जामीन अर्जांच्या सुनावणीदरम्यान अर्जदाराच्या वतीने तपासाची सद्यस्थिती, आरोपपत्र दाखल झाल्याची बाब आणि सहआरोपींना यापूर्वी मिळालेल्या जामिनाचे आदेश न्यायालयासमोर मांडण्यात आले. अर्जदाराची भूमिका इतर सहआरोपींसारखी असल्याचेही न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

उपलब्ध कागदपत्रे, सहआरोपींच्या जामिनाचे आदेश आणि प्रकरणातील परिस्थितीचा विचार करून अतिरिक्त सत्र न्यायाधीश मा. डॉ. उमेशचंद्र मोरे यांनी ६ नोव्हेंबर २०२६ रोजी अटकपूर्व जामीन मंजूर करण्याचे आदेश दिले. दोन्ही प्रकरणांत प्रत्येकी २५ हजार रुपयांचा वैयक्तिक जातमुचलक आणि तेवढ्याच रकमेचा सक्षम जामीनदार सादर करण्याची अट घालण्यात आली आहे. तसेच तपासासाठी उपस्थित राहणे, साक्षीदारांवर दबाव न आणणे आणि न्यायालयाच्या पूर्वपरवानगीशिवाय अधिकारक्षेत्र सोडू नये, अशा अटीही लागू करण्यात आल्या आहेत. या प्रकरणांत किसान मिसाळ यांच्या वतीने ड. जी. के. मिसाळ व सुरेंद्र साळवे बाजू मांडली , तर सरकारच्या वतीने सहाय्यक सरकारी अभियोक्ता पी. एन. मस्कर यांनी बाजू मांडली.

भयान दुष्काळात बीड जिल्ह्यातील रेशनधारकांवर अन्याय नको : बोर्डे

गेवराई । प्रतिनिधी



बीड जिल्ह्यात सध्या भयान दुष्काळ असल्यामुळे शेतात पीक नाही, शेतमजुराला काम नाही. सर्वच क्षेत्रात बीड जिल्हा मागास असून कामगारांना या जिल्ह्यात उपजीविकेचे साधन नाही, अशी खंत बीड जिल्हा ग्राहक पंचायतीचे जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी व्यक्त केली आहे. या परिस्थितीत शासनाने जिल्ह्यातील सर्व रेशनधारकांना धान्य वस्तू उपलब्ध करून द्याव्यात, असे शासनाचे आदेश असताना देखील तांत्रिक कारणामुळे कोणत्याही कार्डधारकावर अन्याय होणार नाही, याची दक्षता प्रशासनाने घ्यावी, अशी मागणी अनिल बोर्डे यांनी केली आहे.

दुष्काळामुळे सर्वसामान्य जनता, शेतकरी, शेतमजूर, कामगार मोठ्या अडचणीत आहेत. अशा वेळी रेशनपासून एकही लाभार्थी वंचित राहता कामा नये. प्रशासनाने याकडे गंभीरपणे लक्ष देऊन जिल्ह्यातील सर्व रेशनधारकांना वेळेवर धान्य वस्तू उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायतचे जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी केली आहे.

५०० लाख आले, आता कामं दिसली पाहिजेतच; बीडकरांचा नगरपरिषदला इशारा : शेख युनूस

बीड । प्रतिनिधी

बीड शहराच्या विकासासाठी शासनाने ५०० लाख रुपयाचा निधी मंजूर केला. ३० ऑक्टोंबर २०२६ रोजीच्या शासन शुद्धी पत्रकानुसार (नपावै-२०२५/प्र.क्र.,२४४(५)/नवि-१६ ही यादी जाहीर करण्यात आली. निधी मंजूर झाल्याने बीडकरामध्ये आनंद आहे. मात्र, आता निधी आला म्हणजे काम झाले असे समजून चालणार नाही. हा निधी वेळेत, योग्य ठिकाणी आणि दर्जेदार कामासाठी खर्च झाला पाहिजे. कामे कागदावर न राहता जमिनीवर दिसली पाहिजेत, असा स्पष्ट इशारा सामाजिक कार्यकर्ते त्याचा स्वतंत्र पत्रकार शेख युनूस यांनी केला आहे. पुढे त्यांनी कुठे किती पैसे आले याची सर्व माहिती दिली. शुद्धिपत्रकारानुसार कडीवडगाव, मुख्य जलवाहिनी आणि ईदगाह



येथील पाणीपुरवठ्याचा कामासाठी एकूण १०० लाख, बलगुजर प्रभाग १४, बेघर निवास केंद्र, प्रियदर्शनी उद्या येथील उद्यान व मैदान विकासासाठी निधी, प्रभाग २१ वडार समाजाचे सभागृह, प्रभाग ३ (विठ्ठल रुक्मिणी मंदिरासमोर), प्रभाग १८ लक्ष्मण नगर येथे सामाजिक सभागृह बांधकाम, अमरधाम शमशानभूमीसह कुरेशी (मोमीनपुरा) चारबावडी, तकिया मस्जिद, दायरा, ह. सय्यद सजोउद्दीन, ह. गालिब शहा दर्गा कबरस्तान विकासासाठी प्रत्येकी १० लाख , प्रशासकीय इमारतीच्या नुतनीकरणासाठी ७० लाख आणि आठवडी बाजार येथे ओटे बांधकाम व काँक्रिटीकरणासाठी ५० लाख रुपयाची तरतूद आहे. ही सर्व कामे प्रामाणिकपणे आणि योग्य दर्जाची झाली पाहिजे.

गेल्या काळात अनेकदा निधी मंजूर होऊनही कामे अर्धवट राहिली, निकृष्ट दर्जाची झाली, असा अनुभव बिडकरानी घेतला आहे, त्यामुळे यावेळी तसे होऊ नये, यासाठी नागरिकांनी लक्ष ठेवले पाहिजे. प्रत्येक कामाची निविदा कधी निघाली, काम कोणाला दिले. कामाची मदत किती, खर्च किती झाला, याची माहिती नगरपरिषद ने फलकावर आणि कार्यालयात जाहीर करावी, अशी मागणी होत आहे. काम सुरू असताना नागरिकांनी प्रत्यक्ष जाऊन पाहणी करावी. साहित्याचा दर्जा तपासावा आणि चुकीचे आढळल्यास जिल्हाधिकारी साहेब यांना लेखी तक्रार द्यावी, असे आव्हान शेख युनूस यांनी केले आहे.

बाजारात रबरी चपलांचा आलाय ऊत; दुकानदारांच्या मनात बक्कळ कमाईचे भूत!

शासन-प्रशासन देईल का लक्ष्य, की ग्राहक राजा असाच होत राहील भक्ष्य?

बीड । प्रतिनिधी

उद्योग-व्यवसाय कोणतेही असो ते कुणीही समाजसेवा करायची म्हणून सुरू करत नाही तर त्यातून अर्थार्जन करता यावे हाच हेतू असतो मात्र हा हेतू जोपासताना त्यांच्याकडे येणाऱ्या ग्राहकांचेही हित पाहिले जावे, एवढी माफक अपेक्षा पदरमोड करून ग्राहक होणाऱ्याने करू नये का? असा प्रश्न दिवाळी निमित्ताने बाजारात खरेदी करण्यासाठी फेरफटका मारताना मनात निर्माण झाला असल्याचे मत मुक्त पत्रकार एस.एम. युसूफ़ यांनी व्यक्त केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, सध्या दुष्काळ असूनही दिवाळीची खरेदी जोरात सुरू आहे. यामुळे सगळीकडे बाजारपेठा ग्राहकांनी भरगच्च फुललेल्या आहेत. अशाच प्रकारे चपलांची दुकाने ग्राहकांनी ओसंडून वाहत आहे. चपलांच्या दुकानात जेव्हा ग्राहक चपला घेण्यासाठी जातो, तेव्हा खालून जाड वजनदार रबरी सोल आणि वर त्या वजनाला न झेपणारे पट्टे लावलेल्या चपलांचा ढिगार ग्राहकांसमोर दुकान मालक किंवा त्याने दुकानात ठेवलेले नोकर टाकतात. ज्यांची किंमत ४०० ते ६०० एवढी लावली जाते. एवढी मोठी रक्कम देऊनही धड सहा महिने ही न चालणाऱ्या चपला समोर पाहिल्यावर ग्राहक विचारतो, बाबा या अशा कशा चपला आहेत तर चपला दाखविणाऱ्यांचे उत्तर ठरलेले येते. ते म्हणतात सध्या याची फॅशन आहे. सर्व कंपन्यांवाले अशाच चपला बनवू लागले आहेत. यावर ग्राहक मनाशीच म्हणतो कशाची डोंबल्याची फॅशन आहे ही.



बरं एवढी मोठी रक्कम देऊन त्या चपला घेतल्या तर त्या माणसाच्या आरोग्यासाठी सुद्धा नुकसानकारकच. रबरी सोल माणसाच्या तळपायातून निघणारे घाम शोषून घेत नाही. पावसाळा वगळता इतर ऋतूत रबरी सोलांच्या चपला जास्त तापतात. ही उष्णता तंतू पेक्षा बारीक असलेल्या तळ पायातील घमन्या मस्तकापर्यंत पोहोचवितात. हे पाहता रबरी सोल असलेल्या चपला पावसाळा वगळता इतर ऋतूत वापरणे आरोग्यासाठी किती हानिकारक आहेत हे सहज लक्षात येते.

पावसाळ्यात आवश्यक असलेल्या रबरी चपला मात्र दुकानदार पावसाळ्यात विक्रीस ठेवत नाहीत. कारण त्या १०० ते १५० रुपयाला मिळतात. त्याचे सोल आणि पट्टे सर्वकाही रबरी असतात आणि त्या चक्क दोन-तीन पावसाळे चालतात. मात्र तेव्हा दुकानदार त्या विक्रीसाठी आणत नाहीत. असे का? तर त्यामध्ये त्यांना हवा त्या प्रमाणात नफा मिळत नाही आणि त्या लवकर खराब होत नाही म्हणून. पावसाळ्यात अशा चपला ग्राहकांना पाहिजे असतानाही त्यावेळी दुकानदार त्या चपला दुकानात ठेवत नाहीत मात्र पावसाळा संपून गेल्यानंतर तेच दुकानदार तकलादु पट्टे लावलेले आणि खालून वजनदार रबरी सोल असलेल्या चपलांचा भडीमार ग्राहकांसमोर करत आहेत. ग्राहक त्या पाहून जेव्हा वैतागतो, आणि त्यांच्यापेक्षा दुसरे चांगले असतील तर दाखवा म्हणतो तेव्हा चपला दाखविणारे म्हणतात लेदरचे आहेत, थोडे महाग असतील असे सांगून लेदर चे म्हणून समोर आणतात त्या रेगझिनच्या चपला.

बहुतेक ते आजही ग्राहकांच्या कानात बिडी आणि गळ्यात रेडू समजतात. बरं त्या रेगझिनच्या चपलांची किंमत किती? तर ११०० रुपयांपासून पुढे अमर्याद. काय चाललंय हे? काय नाही? काही कळायला मार्ग नाही. मान्य आहे की, कुणीही व्यवसाय हा लाभ मिळावा म्हणूनच करतो परंतु अशा प्रकारे व्यवसाय करणे म्हणजे ग्राहकांची लूटच नव्हे का? कंपन्यांकडून दुकानदारांना अशा फालतू व टाकावू चपला किती रुपयांना मिळतात? त्यांनी ते कितीला विकायला हवेत? याचे काहीतरी तारतम्य हवे की नको? याकडे कुणी लक्ष देणार की नाही? या व्यवसायावर देखरेख करण्यासाठी एखादे सरकारी प्रशासनिक कार्यालय किंवा अधिकारी आहे की नाहीत? असेल तर ते आयुक्त तुकाराम मुंढे यांच्यासारखे खमके कधी होतील? असे एक ना अनेक प्रश्न चपलांच्या बाजारपेठेत सुरू असलेली लूट पाहिल्यानंतर उपस्थित होत आहे. असे मनोगत एस.एम.युसूफ़ यांनी शेवटी व्यक्त केले आहे.

साप्ताहिक, विश्वनायक हे पत्र, प्रकाशक, मालक, संपादक, **शेख बिलाल शेख युसूफ** यांनी मुद्रक, जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै, जि.बीड महाराष्ट्र -४३११२२ येथे छापून साप्ताहिक विश्वनायक कार्यालय, घर क्रं.१/१०/६६ खासबाग, खाजानगर, तुळजाभवानी मंदिर जवळ, ता,जि, बीड, महाराष्ट्र -४३११२२ येथे प्रकाशित केले, **(साप्ताहिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. *वाद विवाद जिल्हा न्यायालया अंतर्गत)** मो. 8686888898
ई-मेल- vishvanayak94@gmail.com

The weekly newspaper, Vishvanayak, is published by its publisher, owner, and editor, Sheikh Bilal Sheikh Yusuf. It is printed at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vaijnath, Taluka Parli Vaijnath, District Beed, Maharashtra - 431122, and published from the Vishvanayak Weekly office, House no,1/10/66,Khasbag, Khajanagar, near Tuljabhavani Temple, Taluka & District Beed, Maharashtra - 431122. (The editor may not necessarily agree with the content and news in the weekly publication.*Disputes are subject to the jurisdiction of the district court) Mobile: 8686888898 - Email: vishvanayak94@gmail.com